# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, ३० ऑगस्ट २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ३२

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESSDAY 30 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-32 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5




# गॅसदरात घट, रक्षाबंधनाची भेट!

## एलपीजी सिलिंडरच्या दरात २०० रुपयांची मोठी कपात

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : रक्षाबंधनाच्या एक दिवसपूर्वी केंद्रातील मोदी सरकारने देशभरातील गृहिणींना मोठी भेट दिली आहे. मोदी सरकारने एलपीजी सिलिंडरच्या दरात २०० रुपयांची मोठी कपात जाहीर केली आहे. यासोबतच ७५ लाख महिलांना मोफत गॅस कनेक्शन देण्यात येणार असेही जाहीर केले. या निर्णयामुळे महागाईने होरपळलेल्या सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. गगनाला भिडलेल्या महागाईमुळे जनतेच्या अडचणी वाढल्या होत्या, आता सरकारच्या या निर्णयाने सामान्य जनतेला थोड्या फार प्रमाणात का होईना दिलासा मिळेल.**



३३ कोटी ग्राहकांसाठी २०० रुपयांनी सिलेंडरच्या किमती कमी करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली आहे. उज्ज्वला योजनेतील ग्राहकांसाठी ४०० रुपयांनी दर कमी करण्यात आले आहेत. केंद्र सरकारनं ओनम आणि रक्षाबंधनाच्या निमित्तानं हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, विनाअनुदानित घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर सध्या दिल्लीत ११०३ रुपये, कोलकाता ११२९ रुपये, मुंबईत ११०२ आणि चेन्नईत १११८.५० रुपये आहेत.राजधानी दिल्लीत सध्या अनुदानाशिवाय घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत ११०३ रुपये असून उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात ४०० रुपये मिळतील. म्हणजेच त्यांना सिलिंडरसाठी ७०३ रुपये मोजावे लागणार आहेत. तर सामान्य ग्राहकांसाठी दिल्लीत गॅस सिलिंडरची किंमत ९०३ रुपये असेल. कमी झालेली किंमत आज रात्रीपासून लागू होणार आहे. गेल्या तीन वर्षांत देशात एलपीजी सिलेंडरच्या किमती दुपटीने वाढल्या असताना अनेक दिवसांपासून लोक घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत दिलासा मिळण्याच्या प्रतीक्षेत होते. घरगुती सिलेंडरची किंमत सध्या मुंबईत ११०२.५० रुपये असून वरील घोषणेनंतर आता मुंबईकरांना घरगुती गॅस सिलेंडरसाठी एक हजार रुपयेहून कमी किंमत मोजावी लागेल.

निवडणुकीच्या तोंडावर केंद्र सरकार पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सरकार दिलासा देण्याची शक्यता आहे. पेट्रोलियम कंपन्यांनी चांगली कमाई केली असून करोनाच्या वेळी झालेले नुकसान आता भरून निघाले आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी सरकार वाहन इंधनाच्या दरातही मोठी कपात करू शकते.

२०० रुपये प्रति सिलिंडरच्या अतिरिक्त सबसिडीला मान्यता देण्यात आली आहे, परंतु सबसिडीचा भार केवळ ऑइल मार्केटिंग कंपन्यांवर (OMCs) पडणार नाही. या अनुदानाचा भारही सरकार उचलणार आहे. सरकारवर किती बोजा पडेल आणि ओएमसीवर किती बोजा पडेल, याचा खुलासा करण्यात आलेला नाही. पण किमती कमी करण्याच्या निर्णयामुळे सरकारवर ७५०० कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार असल्याचे समजतेय.

इंडिया आघाडीच्या बैठकीचा धसका घेतल्याने केंद्राने गॅसच्या किमती कमी केल्याचे अप्रत्यक्षपणे त्यांनी म्हटले आहे. विरोधी गटाच्या केवल दोन बैठका आणि गॅस सिलेंडरच्या किमती 200 रुपयांनी कमी...असे ममता बॅनर्जी यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

# राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी रोहिणी खडसेंची वर्णी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दोन महिन्यांपूर्वी अजित पवार यांनी राष्ट्रवादीत बंड केले. त्यानंतर राष्ट्रवादीतील बहुसंख्य आमदारांनी अजित पवारांना साथ दिली. एकनाथ खडसेंनी शरद पवारांसोबत राहण्याचा निर्णय घेतला. या बदल्यात राष्ट्रवादीत खडसेंच्या कन्या रोहिणी खडसे यांच्यावर महिला प्रदेशाध्यक्ष पदी वर्णी लागली आहे.

राष्ट्रवादीतील पक्ष फुटीनंतर शरद पवार राज्यभर दौरा करत आहेत. अशात पुन्हा पक्ष बांधणीकडे लक्ष देत तरुण नेत्यांना संधी देत आहेत. रोहिणी खडसे यांच्यावर राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. याआधी रुपाली चाकणकर यांच्याकडे प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी होती. पण पक्षात फूट पडल्यानंतर चाकणकर यांनी अजित पवार यांना पाठिंबा दिला. त्यानंतर शरद पवार यांच्याकडून त्यांच्या गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षाची नियुक्ती करण्यात आली आहे.

शरद पवार यांनी बीड जिल्ह्यातील नेत्याला राज्य पातळीवर स्थान देण्यात आले आहे. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्ती म्हणून ओळखले जाणाऱ्या बबन गित्ते यांनी शरद पवार यांच्या गटात प्रवेश केला.

आता याच बबन गित्ते यांची प्रदेश उपाध्यक्षपदी वर्णी लावण्यात आली आहे. शरद पवार यांच्याकडून बबन गित्ते यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.

# जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा कधी मिळणार? सुप्रीम कोर्ट

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने जम्मू आणि काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा बहाल करणारे कलम ३७० हटवले आहे. ३७० कलम हटवल्यानंतर केंद्राने जम्मू-काश्मीर राज्याचे जम्मू काश्मीर आणि लडाख अशा दोन केंद्रशासित प्रदेशात रुपांतर केले. कलम ३७० संबंधित याचिकेवर सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील घटनापीठापुढे मागील १२ दिवसांपासून ही सुनावणी सुरू आहे. या सुनावणीदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला अनेक प्रश्न विचारले आहे. जम्मू आणि काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा बहाल करण्यासाठी काही कालमर्यादा किंवा रोडमॅप तयार केला आहे का? अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केली. केंद्र सरकारने मंगळवारी न्यायालयात सांगितले की, तात्पुरता उपाय म्हणून जम्मू आणि काश्मीरला केंद्रशासित प्रदेश बनवले आहे. लडाखला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा कायम राहणार असला तरी जम्मू आणि काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा बहाल केला जाणार आहे. भारताचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड आणि न्यायमूर्ती संजय किशन कौल, संजीव खन्ना, बी.आर. गवई आणि सूर्यकांत यांच्या घटनापीठापुढे ही सुनावणी पार पडली.

# चीनचा अरुणाचल प्रदेशवर पुन्हा एकदा दावा

## सीमेवर वातावरण तापण्याची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारताचा अविभाज्य भाग असलेल्या अरुणाचल प्रदेशवर चीनने पुन्हा एकदा दावा केला आहे. यावेळी चीनने नवा नकाशा जाहीर केला असून यामध्ये अरुणाचल प्रदेश आणि अक्साई चीन, तैवान आणि दक्षिण चीन समुद्राचा बहुतांश भाग असल्याचे नकाशात दाखवले आहे. एप्रिल महिन्यात चीनने अरुणाचल प्रदेशातील ११ गावांचं नामकरण केले होते. यावरून मोठा वादंग निर्माण झाला होता. आता नव्या नकाशात भारताचा भाग दाखवण्यात आल्याने पुन्हा एकदा सीमेवर वातावरण तापण्याची शक्यता आहे.

चीनच्या स्टॅण्डर्ड मॅप सर्व्हिस या संकेतस्थळावर नैसर्गिक संसाधन खात्याकडून चीनचा २०२३ चा अधिकृत नकाशा लॉन्च करण्यात आला, अशी माहिती चीनचे अधिकृत वृत्तपत्र असलेल्या ग्लोबल टाईम्सने ट्वीट केली आहे. हा नकाशा चीन आणि जगातील इतर देशांच्या सीमा रेखाटण्याच्या पद्धतीवर आधारीत आहे, असेही त्यांनी ट्वीटमध्ये म्हटले आहे. जाहीर झालेल्या नव्या नकाशानुसार अरुणाचल प्रदेश, दक्षिण तिबेट, अक्साई चीन, तैवान आणि दक्षिण सागरी भाग चीनचा भाग असल्याचे दाखवण्यात आले आहेत.

अरुणाचल प्रदेश आणि अक्साई या दोन्ही क्षेत्रांबाबत चीन आणि भारतात गेल्या अनेक वर्षांपासून वाद सुरू आहेत. अरुणाचल प्रदेशवर चीनने दावा केला असला तरीही अरुणाचल प्रदेश भारताचा अविभाज्य भाग राहिला आहे. भारताने या भूमिकेचा सातत्याने पुनरुच्चार केला आहे. अरुणाचल प्रदेश भारताचा अविभाज्य भाग आहे, होता आणि कायमस्वरुपी राहणार आह, अशी भूमिका भारताने घेतली आहे. अरुणाचल प्रदेश त्यांच्या नकाशात दाखवून चीनने भारताविरोधात षड्डू ठोकला असून तैवानबरोबरही तणाव निर्माण केला आहे. तर, चीनने दावा केलेल्या दक्षिण चीन समुद्री भागावर व्हिएतनाम, फिलिपाइन्स, मलेशिया, ब्रुनेइ या देशांचा हक्क आहे.

एप्रिल महिन्यात चीनने अरुणाचल प्रदेशच्या ११ जागांचे नामकरण केले होते. तेव्हा अमेरिकेने भारताला पाठिंबा दर्शवला होता. अरूणाचल प्रदेश हे राज्य भारताचा भाग असून त्यामध्ये एकतर्फी बदलास तीव्र विरोध असल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले आहे. 'प्रदीर्घ काळापासून तो भाग (अरुणाचल प्रदेश) भारतात आहे. स्थळांची नावे बदलून कुणी आपला भूप्रदेश वाढविण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याला आमचा विरोध राहील आणि हीच आमची दीर्घकाळापासून भूमिका राहिली आहे, असे व्हाईट हाऊसच्या माध्यम सचिव करीन जिन-पेरी यांनी म्हटले होते.

# भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण अन् शेतकऱ्यांसाठी जे भांडतात त्यांना नोटीस

## अजय पाटील साळुंके : शेतकऱ्यांसाठी एल्गार 'रुमणे मोर्चा'

आधुनिक केसरी न्यूज

वैजापुर : आज दुष्काळ परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सर्व पिक करपून गेले आहे. त्यातच केंद्र सरकारने कांदयावर निर्यात शुल्क आकारल्यामुळे कांद्याचे भाव कोसळत आहेत, तसेच पाउस न आल्यामुळे पाणी प्रश्न, चारा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे मागे जाहीर केलेले कांदा अनुदान, पिक विमा, सतत च्या पावसाची नुकसान भरपाई ई. जाहीर केलेले अनुदान शेतकऱ्यांच्या खात्या मध्ये तत्काळ जमा करावे. म्हणून शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी सकाळी १० वा महाराणा चौक ते तहसील कार्यालय रुमणे आंदोलन हिंदवी जन क्रांती संस्थापक अध्यक्ष अजय पाटील साळुके यांच्या संकल्पनेतून साळुंखे, भारत राष्ट्र समिती शेतकरी नेते चंद्रशेखर साळुंके, स्वाभिमानी शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष दादासाहेब तांबे, भारतीय छावा संघटना, तालुका अध्यक्ष किशोर मगर, अर्चना अजय पाटील,



सोपान पवार, स्वाभिमानी शेतकरी संघटना तालुका सरचिटणीस अमीन शेख, अनिल शेलार, अजित कोकाटे, प्रशांत निकम, आनंद मगर, विकास मगर, नवनाथ घायवट, पोपट जाधव, तातेराव मगर, एकनाथ मगर, रामकिसन गायके, सोमनाथ मगर, तात्याराव जाधव, भाऊराव मगर, योगेश जाधव, गणेश मगर, योगेश पवार, संजय गायके, रमेश जाधव, संतोष गोरे, बाबासाहेब अध्यक्ष बाबासाहेब तांबे, अर्जुन जाधव, भगवान मगर, तात्याराव निकम, मनोज नळे, एन.डी. निकम, विकास मगर, तात्याराव मगर, नारायण जाधव, पोपट जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

**सत्ताधारी आणि विरोधक म्हणजे आली बाबा चाळीस चोर :** यावेळी बोलतांना चंद्रशेखर साळुके म्हणाले की, दिल्लीचेही तख्त राखितो महाराष्ट्र माझा अन् दिल्लीपूढेही गुडघे टेकितो महाराष्ट्र माझा, असे म्हणत त्यांनी शिंदे- फडणवीस पवार सरकारला डिवचले आहे. जनतेने आता हातात घेतलेले आहे रुमणे,असा सपाटा घालू या रुमण्याचा की, तुम्हाला पळता भूई थोडी होईल .सत्ताधारी आणी विरोधक म्हणजे आली बाबा चाळीस चोर आशी गत आहे शेतकर्याला स्वत :च्या न्याय हक्कासाठी रुमणे हातात घेऊन लढाव लागणार आहेत .

**कुषी प्रधान देशात शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ दुर्दैवी**

शेतकर्याना पैशासाठी बॅका वर अवलंबून राहावे लागते तर शेतमाल विकण्यासाठी दलाल व व्यापारी यांच्यावर अवलंबून राहावे लागते यामुळे अचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथेकडे सरकार शेतकर्यांच्या डोळ्यातून वाहणारे पाणी का दिसत नाही . या कुषी प्रधान देशात शेतकर्यावर आत्महत्येची वेळ यासारखी दुर्दैवी गोष्ट कोणती आहे .

**किशोर मगर तालुका अध्यक्ष छावा संघटना**


**शेतकऱ्याचे मरण हेच सरकारचे धोरण**

राज्यात दुष्काळी परीस्थिती निर्माण झालेली आसतांना कांद्याचे उत्पादन व मागणी याचा विचार करून कांदा निर्यात धोरण ठरवुन शेतकरयाना किमान आधारभुत किमत ठरवुन देणे गरजेचे आहे मात्र कुठलेही नियोजन केले जात नाही .

**दादासाहेब तांबे, ता .अध्यक्ष स्वाभिमानी संघटना**

**सदर मोर्चा मधील मागण्या खालील प्रमाणे :-** १ कांदा निर्यात शुल्क रद्द करण्यात यावे . २ . दुष्काळ जाहीर करावा . ३ मागील पिक विमा, कांदा अनुदान, सततच्या पावसाचे अनुदान तत्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावे . ४ . गावात व शेत वस्तीवर पाणी टँकर चालू करावे . ५ . गुरांसाठी दावणीला चारा देण्यात यावा . सरसगट कर्ज माफी करण्यात यावी व बँकेची सक्तीची वसुली ६ . थांबवावी . ७ . तलाठी, ग्रामसेवक, कृषी अधिकारी, शिक्षक कार्यालयात हजर न राहिल्यास दंडात्मक कार्यवाही करावी .

आशा मागण्या करण्यात आल्या यावेळेस बोलतांना अजय पाटील साळुंके म्हणाले शेतकऱ्यांना विम्याचे पैसे मिळाले, नाहीतर हे रुमणे कुठे घुसेल तुम्हाला कळणार नाही . आज शेतकर्यासमोर प्रश्नच प्रश्न आहेत . उत्तर कोण देणार ? त्यांनी उत्तरे दिली नाहीत हा मोर्चा काढुन आम्ही स्वस्थ बसणार नाही .तर पुढील आंदोलन शाततेत नसेल ज्यांनी भ्रष्टाचार करून पैसा कमावला त्यांना सरकार संरक्षण देण्यात अन् जे शेतकर्याच्या न्याय हक्कासाठी भांडत त्यांना मात्र तडीपारीच्या नोटिस देत काहीही झाले तरी शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढणार, असे अजय पाटील साळुंके म्हणाले .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

एवढ्यात श्यामरावांना एक फोन आला. तो फोन त्यांच्या कॉलेजमधील मित्र आणि भौतिकशास्त्राचे प्राध्यापक असलेल्या डॉ राव यांचा होता. ते म्हणाले, ' श्यामराव, उद्या आपल्या येथील महाविद्यालयात डॉ ए पी जे अब्दुल कलाम हॉलमध्ये विद्यार्थ्यांसाठी माझ्या भाषणाचे आयोजन केले आहे. तू , वहिनी आणि मुलांना घेऊन जरूर ये. मी चंद्रयान मोहिमेची माहिती सांगणार आहे. ' हे ऐकून श्यामरावांना खूपच आनंद झाला. ते म्हणाले, ' अरे बरं झालं. नाहीतरी मुलांना अनेक प्रश्न असतातच. मुलांनाच काय आम्हालाही बऱ्याच गोष्टी माहिती नसतात. तेव्हा तुझं भाषण म्हणजे एक पर्वणीच असणार आहे. आम्ही सगळे नक्की येतो.' श्यामराव, श्यामलाताई , राजेश आणि पिंकी वेळेआधीच डॉ कलाम हॉलमध्ये जाऊन आपापल्या जागी स्थानापन्न झाले. अर्थात भगवानराव आणि श्यामरावांचे इतरही मित्र या कार्यक्रमासाठी हजर होतेच. राजेश आणि पिंकी यांच्या शाळेतील इतरही निवडक विद्यार्थ्यांना या प्रसंगी बोलावण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापकही हजर होते. सगळ्यांनाच डॉ राव काय सांगतात याची उत्सुकता लागून राहिली होती. सुरुवातीच्या औपाचारिक स्वागत आणि परिचयानंतर डॉ राव यांनी माहिती द्यायला सुरुवात केली. त्यांनी माहिती देताना प्रोजेक्टरचा वापर केल्याने त्यांचे भाषण अधिकच प्रभावी झाले होते. वेळोवेळी ते समोरच्या पडद्यावर चंद्राच्या पृष्ठभागाचे, यानाचे फोटो आणि इतर माहिती दाखवत होते. 'आपण सगळ्यांनी काल चंद्रयानाचे चंद्रावरचे अवतरण पाहिलेच आहे. आपल्या देशाचे हे मोठे यश आहे. पण हे यश एकाएकी मिळालेले नाही. यामागे वैज्ञानिकांचे अथक प्रयत्न कारणीभूत आहेत. चंद्रयान मोहीम एक आणि दोन यातील यशापयशानंतर त्यातील यशाने हुरळून न जाता आणि अपयशाने खचून न जाता आपल्या वैज्ञानिकांनी आपले प्रयत्न सुरूच ठेवले आणि त्यातूनच आजचे हे दैदिप्यमान यश आपल्याला प्राप्त झाले. मी तुम्हाला माहिती तर सांगणारच आहे पण काही प्रश्नही विचारणार आहे. तुम्ही पण तुमच्या मनातील शंका विचारू शकता. तुम्हाला सांगता येईल का की मानवाने चंद्रावर पहिले पाऊल कधी ठेवले ? ' ' २० जुलै १९६९ या दिवशी अमेरिकेच्या अपोलो ११ या यानातून मानवाचे पहिले पाऊल चंद्रभूमीवर प्रथम पडले. ' पिंकीने उत्तर दिले. ' शाब्बास, बेटा. अगदी बरोबर उत्तर दिलेस, ' डॉ राव म्हणाले आणि प्रेक्षकांमधून टाळ्यांचा कडकडाट झाला.



## समृद्ध प्राचीन भारत



# आनंदी पहाट

## बौद्धिक विकासाचा दृष्टिकोन असावा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

जसजसे वय वाढत जाते, तसतसे शारीरिक, मानसिक, भावनिक पातळीवर खूप बदल होत जातात. वाढत्या वयात खरी गरज असते सुख संवादाची, त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला समजून घ्यायची. एकीकडे शारीरिक दुखणी काहीवेळा सहन करावी लागत असतात, तर दुसरीकडे संवादाचा अभाव निर्माण होत जातो. त्या संवादाआभावी अनेक मानसिक आणि भावनिक पातळीवर संघर्ष सुरु होत जातो. काहीवेळा आपल्या आपापसातील संवादाची सुरुवातच विसंवादाने होत असल्याचे दिसून येते. विचारांचा अभाव हे खरे तर त्यामागचे मूळ कारण असते. संवादाचा अभाव हे माणसांमाणसांत दुरावा निर्माण होण्याचे एक महत्वाचे कारण असते. ह्यामध्ये अनेकदा आचारांपेक्षा विचारांना महत्व आणि प्राधान्य कमी दिले जात असते. विवेकी विचार न करताच आचरण केले जाते, कृती केली जाते; काहीवेळा ती तापदायक, घातक ठरू शकते. क्रोध, संताप, मानसिक असमतोल, अपयश, नैराश्य या बाबींचा मनावर विपरीत परिणाम झालेली अनेक उदाहरणे आपल्याला बघायला मिळत आहेत. काहीजणांच्या बाबतीत तो परिणाम आयुष्यभर प्रत्येक गोष्टीवर झाल्याचे दिसून येते. लहानपणापासूनच प्रत्येक व्यक्तीच्या भावनिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाच्या दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करणे जरुरीचे असते, हे समजून घेतले पाहिजे. जन्माला येणाऱ्या प्रत्येक जीवाला भावना असतातच. त्या भावना समजून घेऊन त्या व्यक्तीचे अंतर्मन अबाधित ठेवणे हे केवळ कर्तव्य म्हणून नाही, तर नैतिक जबाबदारी म्हणून सांभाळले पाहिजे. उपक्रमशीलता हा आपल्या शिक्षण व्यवस्थेतील महत्वाचा घटक असल्याचे मानले जाते. त्यांत नित्य नवीन बदल होणे अभिप्रेत असते. कारण योग्य बदल हाच विकासाचा पाया असतो. अनकेदा ह्या बदलाबद्दलच आपण अनभिज्ञ अथवा गाफील असतो.



आधुनिक केसरी

**घेतात भरारी | अष्टपुत्र ||**
चोजविला ज्याने | घास अमृताचा ||
ज्ञाना माधवाचा | धन्य झाला ||१||
गोंजारता दुःख | होते द्विगुणित ||
आनंदे सोशित | जावे त्याला ||२||
केला उपदेश | दावूनी संसार ||
तुका ज्ञानेश्वर | दादा ठायी ||३||
आठवता मूर्ती | सात्त्विक सोज्वळ ||
शुद्ध गंगाजळ | नेत्री दाटे ||४||
सत्यभामा भार्या | शोभली संसारी ||
घेतात भरारी | अष्टपुत्र ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

पवित्राः सन्तु सङ्कल्पाः विचारापि तथैव च|
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ७८ || माझे संकल्प पवित्र असोत. विचार देखील पवित्र असोत. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

मोह निशा में सोवता, वीता जन्म अनेक।
मधुविद्या से जागता, भ्रम आलस गये नेक
।।३०।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय)
०४/०१/३०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
मोह अंधःकारात झोपून अनेक जन्म निघून गेले. जेव्हा मधुविद्येचा म्हणजेच ब्रम्हविद्येचा उत्कृष्ट प्रकाश उदय झाला, तेव्हा जाग आली आणि त्यामुळे भ्रम आणि आळस सर्व दूर झाले.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# आत्मदर्शन

आधुनिक केसरी

त्यालाच आत्मदर्शी अवस्था म्हणतात. लक्ष मायेचा प्रांत्अ लक्ष-- स्वस्वरूपाचा प्रांत पण जेथे माया नाहीशी होऊन जाते तेथे लक्ष लय पावते.लक्ष शिल्लक रहात नाही त्याच बरोबर अलक्ष पण संपते. या स्थितीला मोक्ष या म्हणतात. समर्थांनी आपल्याला समजेल अशा पध्दतीने ओव्या लिहिल्या आहेत. आपण सर्व जण त्यांचे आजन्म ऋणी आहोत. साधनेचे शेवटचे टोक कोणते? जेथे ध्यान धारणा थांबते, कल्पना निर्विकल्प स्वरूपात विरते आणि केवळ शुध्द जाणीवमय अत्यंत सुक्ष्म ब्रह्मस्वरूप तेवढे शिल्लक राहते.मन हे जोपर्यंत ध्यान धारणाकरण्या साठी जरूरीचे वाटते.तो ध्यानधारणा पासुन तीळभरही विचलित होत नाही. पण साधक अवस्था संपून स्वरूप साक्षात्कार झाला की मन उन्मनी होते,मग अशा सिदध पुरूषाला ध्यान, धारणा, कल्पना या गोष्टी आपोआप विराम पावतात. मी पणाचे बंधन तुटते,प्रपंचरूपी मृगजळ संपून जाते ते कोमेजते,सुकले जाते, देहबुद्धी ने घातलेले व मुळातच खोटे असलेले मी पणाचे बंधन तुटते आणि जो वास्तविक अजन्मा असा आत्मा, त्याची जन्ममरणाच्यादुःखातून सुटका होते. शाश्वत सत्य सापडते. यालाच साधनेचे शेवटचे टोक म्हणतात. मला या ठिकाणी एक गोष्ट आवर्जून सांगायची आहे. मित्रांनो ही साधना कर्मावर आधारलेली असावी. म्हणजेच आपण मनुष्य योनीत जन्म घेतला आहे. जीवन जगण्यासाठी जे जे चांगले आदर्श कर्म हाती घेतले आहे ते ते मनापासून करा यश येणार आहे. सद्गुरू घ्या या शब्दांवर विश्वास ठेवा.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# शुद्ध भावनेशिवाय सर्व व्यर्थ

आधुनिक केसरी

भगवंताला शरण जाण्यात देहबुद्धी आणि अभिमान आड येतो, परिस्थिती आड येत नाही. ती व्यसनाच्या आड कुठे येते ? अभिमान जाण्यासाठी उपाय म्हणजे, जे जे कराल ते ते भगवंताला अर्पण करावे. तोच कर्ता, आपण काहीच करीत नाही, अशी भावना ठेवावी; म्हणजे अभिमानही भगवंताला अर्पण करावा. आपण भगवंताशी काही ना काही कारणाने संबंध ठेवावा. त्याच्याशी बोलावे; त्याचे नाम घ्यावे. नामासारखे दुसरे खरे साधन नाही. वासरू घेऊन गेले म्हणजे जशी गाय पाठीमागून आपोआप येते, त्याप्रमाणे नाम घेतले की भगवंत त्यामागे येतो. ज्याला एकदा नामाची गोडी लागली त्याला प्रपंचाची भीती वाटू लागते. विषय त्याला कडू वाटू लागतात. परमात्म्याच्या नामाने संसार बिघडतो हे म्हणणे चुकीचे आहे. नाम घ्यायचे म्हणून कर्ममार्ग सोडू नये. नामाची गोडी ज्याला आली त्याचीच कर्मे सुटतात. नामाचा अनुभव नाही असे म्हणणे खोटे आहे; आपण ते जितके घ्यावे तितके घेतच नाही. नामात प्रेम येईल असे करावे. जन्माला आल्यासारखे नामाचे होऊन राहावे. भगवंत आपल्या नामस्मरणात आहे. शुद्ध भावनेशिवाय सर्व व्यर्थ आहे; आणि भाव शुद्ध होण्यासाठी सत्समागमावाचून दुसरा उपाय नाही. एकदा त्याचे होऊन राहिले म्हणजे तोच सर्व उपाय काढतो. 'मी' अमुक एक साधन करीन, असे म्हणू नये. 'परमेश्वरा, तूच माझ्या हातून करवून घेणारा आहेस,' अशी दृढ भावना ठेवावी. समजा, आपण एक व्यापार केला, त्यासाठी एकाने आपल्याला भांडवल दिले, तर त्या माणसाला आपण कधीही विसरत नाही; त्याचप्रमाणे ज्या भगवंताने आपल्याला विद्या, पैसा, प्रकृती दिली, त्याला आपण कधीही विसरू नये. भगवंत हा सहजसाध्य आहे, सुलभसाध्य नाही. निसर्गाने जे आपल्याकडे येते ते 'सहज' होय. म्हणून, सहजसाध्य याचा अर्थ, फलाची अपेक्षा नसणे आणि कर्तव्याचा अभिमान नसणे हा समजावा. भगवंताने आपल्याला ज्या स्थितीत ठेवले आहे त्यात समाधान मानून त्याचा विसर पडू न द्यावा. जो स्वतःपासून दूर आहे त्याला भगवंत दूर आहे. आपण मनुष्यजन्माला आलो हीच आपण भगवंताचे होण्याची खूण आहे. भोग आणि दुःख यात वेळ न घालविता, भगवंताकडे लक्ष दिले पाहीजे. याच जन्मात सुविचाराने आणि सद्बुद्धीने भगवंत आपलासा करणे, हेच आपले खरे कर्तव्य आहे. याकरिताच सतत त्याचे ध्यान करावे, आणि मनातून आपले भगवंताशी नाते जोडून ठेवावे, यासारखा दुसरा सुलभ उपाय नाही.



# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

देहाचा सदुपयोग मला ठाऊक नाही ...गुरुवर्या अजन का येत नाहीत तुम्ही निष्ठुर तर जरूर नाहीत मग माझा अपराध तो काय ? जन्म मरण माझे हाती नाही मग ह्या हाल अपेष्ठांचा अंत कधी होईल .मी पापी आहे म्हणून तुम्ही येत नाही का ? पण पाप करताना मला तशी बुद्धी का होते ? मला जर याचे ज्ञान असते तर मी केले नसते हे मला आता कळून चुकले आहे तुम्ही लेकराचा हा अपराध क्षमा करू शकत नाहीत काय ? मी एवढा टाकाऊ आहे का मग हे जीवन घेऊन तरी काय करू . माझ्या मनाचा गोंधळ आता मला असह्य होत आहे .हि मनाची द्वैत अवस्था कशी थांबवू ? तुम्ही कोठे आहात मी तुम्हाला कोठे शोधू ? मला तर तुम्ही जवळ असलात तरी दिसणार नाहीत कारण मला तुमची ओळखच झाली नाही . लोभामुळे माझी मन शांती होत नाही. मला आनंदात सतत राहावे तर वाटते पण खरा आनंद म्हणजे काय ? तो कोठे मिळेल ? त्याच्या शोध कसा घ्यावा ? कुठवर घ्यावा.



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

प्रायो दुरन्तपर्यन्ताः सम्पदोऽपि दुरात्मनाम् ।
भवन्ति हि सुखोदर्का विषदोऽपि महात्मनाम् ॥

स्पष्टीकरण – लुबाडून मिळवलेल्या संपत्तीच्या पोटात एक प्रकारची चिंता किंवा धाक-धूक असते. त्यातूनच पुढे अनेक वाईट परिणाम भोगावे लागतात. आपण दुसऱ्याला लुबाडून गबर झालो, तर आपल्यालाही लुबाडणारा कोणीतरी भेटतोच; आणि सज्जनांना जरी चालू घडीला विपत्ती भोगाव्या लागल्या, तरी शेवटी या ना त्या मार्गाने त्यांचे भले होते.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ३० ऑगस्ट २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# राज्यात बांबू उत्पादन व उद्योगाला प्रोत्साहन देणार

## नागपुरातील बांबू 'ऊती' टिश्यू कल्चर केंद्राचे ना. मुनगंटीवार यांच्या हस्ते उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** बांबू हा पर्यावरणरक्षक असून, बांबू उद्योगात असंख्य लोकांना रोजगार देण्याची क्षमता असल्याने राज्यात बांबू उत्पादन वाढीला प्रोत्साहन, त्यापासून तयार होणाऱ्या आकर्षक वस्तू, हस्तकला आणि फर्निचर ला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी बांबू विकास मंडळाने नियोजन करावे आणि यासंदर्भात जागृती निर्माण करण्यासाठी तातडीने नियोजन करावे अशा सूचना राज्याचे वने सांस्कृतिक कार्ये आणि मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आज दिल्या. बांबू विकास मंडळाच्या बैठकीत ना मुनगंटीवार यांनी मंडळाच्या वाटचालीचा सविस्तर आढावा घेत महत्वाच्या सूचना केल्या. महाराष्ट्र बांबू विकास मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्रीनिवास राव यावेळी उपस्थित होते. तत्पूर्वी महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या आवारातील बांबू ऊती संवर्धन (टिश्यू कल्चर) केंद्राचे उदघाटन मुनगंटीवार यांनी केले. मंडळाच्या बैठकीत राव यांनी प्रथम मंडळाच्या कार्यपध्दतीसंदर्भात सादरीकरण केले. ना. मुनगंटीवार यावेळी म्हणाले की, बांबू लागवडी संदर्भात लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याची आपली जबाबदारी आहे. शेतकऱ्यांना हमखास उत्पन्न देणारे पिक म्हणून विश्वास देवून प्रत्येक जिल्ह्यात बांबूपासून तयार होणाऱ्या वस्तूंचे प्रशिक्षण व उद्योग उभारणीसाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने वन विभाग पुढाकार घेईल असेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले, बांबूपासून तयार वस्तूंना मुंबईसारख्या शहरात आणि विदेशातदेखिल मागणी आहे; मंडळाने यासाठी तज्ञ आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या विद्याविशारद (आर्किटेक्ट), डिजाइनर यांची मदत घेवून नवीनतम गोष्टी बनवून योग्य विपणन व्यवस्थेला(मार्केटिंग) बळ देण्याची गरज असल्याचे ना. मुनगंटीवार म्हणाले. जैविक इंधन वापराकडे मोठमोठ्या उद्योगांचा कल आहे;



त्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्याना (फार्मर प्रोड्यूसर्स कंपनी ) एकत्र करुन उद्योग क्षेत्रातील नामांकित कारखान्यात बांबू पॅलेट देता येतील का याचा अभ्यास करुन त्या दृष्टीने काम करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. बांबू उत्पादक देशांपैकी भारतात याचे क्षेत्र सर्वांत जास्त आहे. उत्पन्नात मात्र इतर देश आघाडीवर आहेत, हे आपल्याला बदलवायचे आहे . सर्व सरकारी परवानग्यांच्या कचाट्यातून मुक्त झालेले बांबू एक औद्योगिक पीक म्हणून पुढे येत आहे. बांबू हे व्यापारी पीक असल्याने त्यापासून बनवलेल्या वस्तूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारात चांगली मागणी असते. बांबू हा जगभरातील अविकसित, अर्धविकसित व विकसित देशांतील जनतेचा जीवनाधार आहे. बांबू हा पर्यावरणरक्षक तर आहेच, याचबरोबरीने बांबू उद्योगात असंख्य लोकांना रोजगार देण्याची क्षमता आहे. पडवीच्या आधारापासून ते कागदनिर्मितीपर्यंत सर्व उद्योग येतात.त्यामुळे बांबू प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी आपल्याला काम करायचे आहे असेही ना. मुनगंटीवार म्हणाले. राज्यातील बुरड समाजाकडे कला आहे, विविध वस्तू हा समाज बनवतो, या समाजाच्या विकासाकरिता व सक्षम करण्यासाठी आधुनिक पद्धतीने त्यांची कला विकसित व्हावी असा मानस असून यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्याच्या सूचनाही ना. मुनगंटीवार यांनी बैठकीत दिल्या.

## महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांच्या आंदोलनावर आमदार प्रतिभा धानोरकर यांचे सरकारला पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांच्या 10 दिवसीय राज्यव्यापी



आंदोलनावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्र राज्य होमगार्ड महासंघाने निवेदन दिले आहे. या पार्श्वभूमीवर वरोरा भद्रावती मतदारसंघाचे आमदार प्रतिभा धानोरकर यांनी होमगार्ड सैनिकांच्या न्याय्य मागण्या मान्य करण्याची विनंती सरकारकडे पत्राद्वारे केली आहे. महासंघाचे अध्यक्ष डॉ. प्रतापराव पाटील यांनी दिलेल्या निवेदनात होमगार्ड सैनिकांच्या खालील मागण्यांचा समावेश आहे.

केंद्र सरकारच्या उपसचिवांनी काढलेल्या दि. 17 जानेवारी 1984 चा आदेश चे अमलबजावणी करून होमगार्डना 365 दिवस नियमित करण्यात यावे, बॉम्बे होमगार्ड ॲक्ट 1947 मधील दर 3 वर्षांनी होणाऱ्या पुर्ननोंदणी पुनर्नियुक्ती प्रणाली अथवा पद्धत कायमस्वरूपी बंद करण्यात यावी, पोलीस विभाग प्रमाणेच राज्याचे दर आर्थिक वर्षी त्यांचा बजट सत्रात होमगार्ड विभाग करिता स्वतंत्र बजट ची व्यवस्था निर्माण करावे तसेच प्रतिवर्ष महागाई दरानुसार होमगार्ड विभागाला महागाई भत्ता उपलब्ध करण्याचे विधान तयार करण्यात यावे, इतर राज्या प्रमाणे महाराष्ट्र राज्य मध्ये देखील 3 वर्षे सेवा देवू केलेले होमगार्ड सैनिकांना पोलीस विभाग, वन विभाग किंवा इत्यादी शासकीय प्रशासकीय विभागात 5 टक्के आरक्षण सह भरती निवळ प्रक्रियेत वयात आणि उंचीत विशेष सवलत देवूनी सरळ भरती वा नेमणूक देण्यात यावी, बॉम्बे होमगार्ड अधिनियम 1947 कलम 9 नुसार होमगार्ड हा लोकसेवक समजण्यात येतो त्यानुसार होमगार्ड प्रशासकीय लोकसेवकांप्रमाणे सोयी सेवा सुविधा देण्यात यावे, होमगार्ड सैनिकांची सेवानिवृत्ती वयोमर्यादा किमान 60 वर्षे पर्यंत करण्यात यावी, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार होमगार्ड सैनिकांना सातवा वेतनुसार रु. 990 रुपये दर प्रमाणे मानधन वेतन मान वाढवून देण्यात यावे, आदी मागण्यांचा समावेश आहे.

या संदर्भात आमदार प्रतिभा धानोरकर यांनी सांगितले की, होमगार्ड सैनिकांना गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघर्ष करावा लागत आहे. यावेळी होमगार्ड सैनिकांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. राज्य सरकारने या मागण्या मान्य करून होमगार्ड सैनिकांना न्याय दिला पाहिजे, यासाठी त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे.

## कृत्रिम पावसाचा प्रयोग करावा : आ खडसे

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** राज्यभरातील जिल्ह्यांत शासन आपल्या दारी उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांत जेवढा खर्च होतो, तेवढाच खर्च कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी लागतो, असा राज्य सरकारला टोला लगावत गुळाला मुंग्या जशा चिकटून बसतात, तसे काही लोकं सत्तेला चिकटून असतात, अशी खोचक टीका अजित पवार गटावर माजी मंत्री तथा राष्ट्रवादी कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते आमदार एकनाथ खडसे यांनी केली.

आमदार खडसे यांनी शहरातील मुक्ताई या निवासस्थानी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यांनी पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या पाच सप्टेंबरला होणाऱ्या जिल्हा दौऱ्याबाबत माहिती दिली. त्यांनी शिंदे-फडणवीस-पवार यांच्या सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. याप्रसंगी पक्षाचे नेते माजी मंत्री गुलाबराव देवकर, जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील, महानगराध्यक्ष अशोक लाडवंजारी आदी उपस्थित होते.

आमदार खडसे यांनी राज्यभरात शिंदे- फडणवीस-पवार सरकारच्या शासन आपल्या दारी उपक्रमावर शेलक्या शब्दांत टीका केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या उपस्थितीत शासन आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत कार्यक्रम होत आहेत. त्यासाठी जो खर्च केला जात आहे, तेवढ्याच खर्चात राज्यात कृत्रिम पाऊस पाडून दुष्काळी परिस्थितीवर मात करता येईल, असा खोचक सल्ला त्यांनी दिला. २०१४ मध्ये आपण महसूलमंत्री असताना राज्यभरात कृत्रिम पावसाचा प्रयोग राबविला होता, तो यशस्वी झाला होता. राज्याचा दोन तृतीयांश भाग हा दुष्काळसदृश आहे. अनेक भागांत उडीद, मूग गेल्यात जमा आहे. पाऊस नसल्यामुळे पिके कशी जगवावीत, असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे. सद्यःस्थिती पिके जगवायची असतील, तर कृत्रिम पावसाची आवश्यकता आहे, असे सांगत सरकारने शासन आपल्या दारी उपक्रम राबविण्याऐवजी कृत्रिम पाऊस पाडावा, असा सल्ला आमदार खडसे यांनी दिला आहे.

## अणणा भाऊंना भारतरत्न मिळण्यासाठी मोदी यांना पत्र लिहीणार : मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे केवळ एका विशिष्ट वर्गाला नव्हे तर संपूर्ण मानव जातीला प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या विचारांची व कार्यकर्तुत्वाची प्रेरणा घेऊन समाजाने मार्गक्रमण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

मातंग चेतना परिषद विदर्भ प्रदेशाच्या वतीने आयोजित लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०३ व्या जयंतीनिमीत्त ज्येष्ठ नागरिकांच्या सत्कार सोहळ्यात मुनगंटीवार बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पुसद येथील प. पू. गजानंदजी माऊली, भागवताचार्य मनिषजी महाराज, वामन आमटे, गौरव गांजरे, योग नृत्य परिवाराचे अध्यक्ष गोपाल मुंदडा, सुरेश घोडके, राजेश आमटे, एड. आशिष मुंधडा उपस्थित होते.

अण्णा भाऊ साठेंनी समाजासाठी अतिशय बिकट परिस्थीतीत काम केले. त्यांनी समाजाच्या व्यथा, वेदना आपल्या साहित्यात मांडल्या. अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून अण्णाभाऊंच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू समाजासमोर येतात व त्यातून समाजाला व नविन पिढीला प्रेरणा मिळते,' असेही ना. मुनगंटीवार म्हणाले. प्रास्ताविकातून वामन आमटे यांनी समाजाच्या अडचणी मांडून काही मागण्या केल्या. त्यावर ना. मुनगंटीवार यांनी समाजाच्या सर्व मागण्यांचा सहानूभूतीपूर्वक विचार करण्यात येईल, असा विश्वास दिला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळावे, मातंग समाजाच्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याला शासकीय मदत मिळावी, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरे मिळावी, बँड पथकातील कलावंतांना मानधन मिळावे तसेच समाजातील प्रत्येक कुटुंबाला पाच एकर शेती वाहण्यास मिळावी व समाजाला जागेसहीत एक समाजभवन मिळावे या मागण्यांचा समावेश होता. यावर उत्तर देताना मुनगंटीवार म्हणाले, रमाई आवास योजनेअंतर्गत आपल्या समाजाला घरे मिळवून देण्यासाठी मी पूर्ण प्रयत्न करीन तसेच शेतीऐवजी येणाऱ्या पिढीला स्कील डेव्हलपमेंटचे ट्रेनींग देवून लहान-लहान उद्योग स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, बँड वाजविणाऱ्या कलाकारांना मानधन देण्यासंदर्भात योजनेत समावेश आहे कां याची चौकशी करून सर्व गोष्टींचा पाठपुरावा करण्याचा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी दिला. देशगौरव मा.पतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्याकडे अण्णाभाऊंना भारतरत्न देण्याची मागणी करणार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न द्यावे यासाठी मी देशगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांना पत्र लिहीणार व त्याचा पाठपुरावा करणार असल्याचे मुनगंटीवार यांनी घोषीत केले.



# इम्रान खान यांना दिलासा

आधुनिक केसरी

तोशखाना प्रकरणात इस्लामाबाद उच्च न्यायालयाने पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि पाकिस्तान तहरिक ए इन्साफ (पीटीआय) या पक्षाचे अध्यक्ष इम्रान खान यांच्या शिक्षेस स्थगिती देत त्यांचा जामीन मंजूर केला आहे. पाकिस्तानमधील जिल्हा सत्र न्यायालयाने इम्रान खान यांना तोशखाना प्रकरणात ५ ऑगस्ट रोजी ३ वर्षांची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर त्यांना लाहोरमधल्या जमान पार्क येथील राहत्या घरातून अटक करण्यात आली होती. तेव्हापासून इम्रान खान अटक येथील तुरुंगात कैद आहेत. न्यायालयाने इम्रान खान यांना १ लाख रुपयांचा दंडदेखील ठोठावला होता, तसेच त्यांच्यावर ५ वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यात आली आहे. दरम्यान, इम्रान खान यांच्या वकिलांनी न्यायालयाला विनंती केली आहे की, तुरुंगातून बाहेर पडल्यावर इम्रान खान यांना दुसऱ्या कुठल्या प्रकरणात पुन्हा कैद केलं जाऊ नये. मात्र खान यांच्याविरोधात अनेक खटले प्रलंबित आहेत, ज्यापैकी दोन प्रकरणं अशी आहेत, ज्यामध्ये तपास यंत्रणा इम्रान खान यांना कुठल्याही क्षणी अटक करू शकतात. पाकिस्तानी वृत्तपत्र दी एक्सप्रेस ट्रिब्यूनने दिलेल्या वृत्तानुसार फेडरल इन्वेस्टिगेशन एजन्सी (एफआयए) आणि नॅशनल अकाउंटेबिलिटी ब्युरोची (एनएबी) पथकं इम्रान खान यांची वाट पाहत आहेत. पाकिस्तामधील मुस्लीम लीग-नवाझ (पीएमएल-एन) पक्षाच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारने ऑगस्ट २०२२ मध्ये इम्रान खान यांच्यावर तोशखाना प्रकरणात गुन्हा दाखल केला होता. तेव्हापासून हे तोशखाना प्रकरण चर्चेत आलं आहे. पंतप्रधान असताना इम्रान खान यांनी त्यांना मिळालेल्या भेटवस्तूंची माहिती तोशखाना विभागाकडे उघड केली नाही. तसेच, या भेटवस्तू बेकायदेशीरपणे विकल्याचा आरोप इम्रान खान यांच्यावर करण्यात आला होता. पाकिस्तानमध्ये तोशखाना विभागाची १९७४ साली स्थापना झालेली आहे. लोकप्रतिनिधींना मिळालेल्या भेटवस्तू नियमाप्रमाणे या विभागात जमा करत माहिती देणं बंधनकारक असतं. परंतु, २०१८ साली सत्तेवर आल्यानंतर इम्रान खान यांनी त्यांना मिळालेल्या भेटवस्तूंची माहिती तोशखाना विभागाला देण्यास नकार दिला. माहिती दिल्यास अन्य देशांशी असलेल्या संबंधावर परिणाम होईल, असा दावा इम्रान खान यांनी केला होता. त्यानंतर इम्रान खान यांनी पाकिस्तान निवडणूक आयोगाला पत्र लिहून मिळालेल्या भेटवस्तूंपैकी साधारण ४ भेटवस्तूंची विक्री केल्याच कबूल केलं होतं. विक्री केलेल्या भेटवस्तूंची तोशखाना विभागाला उचित किंमत दिल्याचाही दावा इम्रान खान यांनी केला होता.

# विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या चिंताजनक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी


**राजस्थान येथील कोटा या शैक्षणिक शहरात एकाच दिवशी दोन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यात लातूरचा आविष्कार कासलेचा समावेश आहे. जेई परीक्षेची तयारी करणाऱ्या अविष्कारने आत्महत्या केल्यानंतर या परिसरातील लोकांना धक्काच बसला आहे. सध्याच्या काळात पालक दोघेही आपल्या मुलांबद्दल खूप महत्त्वाकांक्षी झाले आहेत. अभ्यासात चांगली कामगिरी करण्यासाठी पालक आपल्या मुलांवर असामान्य दबाव टाकतात. मुलांमध्ये अष्टपैलू गुण असणे अपेक्षित आहे, असं पालकांना वाटत असते.अपेक्षा करावी पण आपल्या मुलांना देखील पालकांनी समजून घेण्याची गरज आहे. विशेष लहानपणापासूनच पालक मुलांवर अभ्यासाचा भार टाकत असतात. पालकांच्या मुलांप्रती अपेक्षा वाढलेल्या आहेत.**

आजकाल, पालक आपल्या मुलांवर लहानपणापासूनच वेगवेगळ्या स्वरूपात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे दबाव टाकताना दिसतात. आई-वडील आपल्या मुलांमधील स्वप्नांना पंख देत आहेत, जे त्यांना आयुष्यात मिळू शकले नाही, ते आपल्या मुलांमध्ये पाहण्याच्या धडपडीमुळे मुलांचे मन दडपणाखाली जात आहे. पालकांना नकळत मनाने मुलांकडून करिअर घडवण्याची दडपलेली इच्छा पूर्ण करून मानसिकदृष्ट्या अभ्यासाचे दडपण ठेवायचे असते, परिणामी मुलांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण होते, आणि शेवटी मुलं आत्महत्येकडे वळतात. मुलं दबावाच्या परिस्थितीला तोंड देण्याच्या स्थितीत नसतात. भारतातील समाजीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. सध्याच्या काळात तरूण वयापासूनच शिक्षण कष्टदायक होत आहे. लहानपणापासूनच शाळेच्या दप्तरांचे ओझे वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर भारताचे शिक्षण स्पर्धात्मक झाले आहे, निकालांना प्राधान्य दिले जात आहे. शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून मुलांच्या क्षमतेचे मूल्यमापन केले जात आहे. विद्यार्थ्यांवर चांगली कामगिरी करण्याचे, अव्वल क्रमांक मिळविण्याचे दडपण असते, कधी कधी हे दडपण कुटुंबाकडून, भावंडांकडून येते, समाजामुळे येत असते. विद्यार्थी अभ्यासात अतिरिक्त तास घालवतात आणि त्यांना मनोरंजन आणि समायोजन क्रियाकलापांसाठी वेळ मिळत नाही. या प्रक्रियेदरम्यान, विद्यार्थ्यांसमोर शैक्षणिक आव्हाने वाढतात.किंवा अपयशाबद्दल अत्याधिक जागरूक होऊ शकतात. या विचारसरणीमुळे मानसिक तणाव वाढतो, संघर्षाची परिस्थिती निर्माण होते, व्यक्तिमत्व विकासात अडथळे येतात, अंतर्मुखी व्यक्तिमत्व फुलू लागते, संघर्षाची परिस्थिती दिसते, हळूहळू दारू आणि अंमली पदार्थांच्या व्यसनाचा बळी होतो, अंमली पदार्थांचे सेवन ही जीवनाची समस्या बनते. अत्यंत निराशा, राग या स्थितीत जीवनातून पळून जाण्याच्या इच्छेला बळ मिळू लागते आणि यातून सुटका .करून घेण्यासाठी विद्यार्थी आत्महत्या करतात. विद्यार्थ्यांच्या कामगिरीमध्ये अडथळा म्हणून शैक्षणिक दबाव संघर्षाची परिस्थिती दिसू लागते, हळूहळू दारू आणि अंमली पदार्थांच्या व्यसनाधीनतेला बळी पडतात, ते अंमली पदार्थ सेवनाला जीवनाचा एक भाग मानू लागतात. प्रत्येकाची सहनशीलता वेगळी असते, काहींना नीट तोंड देता येते, काहींना जमत नाही. त्याचा त्यांच्या प्रकृतीवर अप्रत्यक्ष परिणाम होतो, अशा वेळी मुलांमध्ये जास्त भूक लागणे किंवा भूक न लागणे असे प्रकार दिसून येतात. असमर्थतेमुळेही तणावग्रस्त विद्यार्थी आपला अभ्यास मध्यभागीच सोडतात, वाईट परिस्थितीत तणावग्रस्त विद्यार्थी मनात आत्महत्येचे विचार आणतात आणि नंतर आत्महत्या करतात. १५ ते २९ वर्षे वयोगटातील किशोरवयीन आणि तरुण प्रौढांमध्ये आत्महत्या करण्याचे प्रमाण भारतात सर्वाधिक आहे. परीक्षेतील अपयश हे देशातील आत्महत्यांच्या पहिल्या १० कारणांपैकी एक आहे, तर कौटुंबिक समस्या पहिल्या ३ मध्ये आहेत. शहरी भागातील श्रीमंत आणि सुशिक्षित कुटुंबातील तरुणांमध्ये आत्महत्या करण्याची प्रवृत्ती जास्त असते. मुलांवर अभ्यासासाठी पालकांचा जास्त दबाव, विद्यार्थ्यांच्या कौशल्य किंवा आवडीशी सुसंगत नसलेल्या मुलांकडून चांगल्या परिणामांची अपेक्षा करणे. अनेक प्रकरणांमध्ये मुलांच्या मनात आत्महत्येची भावना निर्माण होत नाही, पालकांच्या अवाजवी दबावामुळे, मुलांच्या पालकत्वाची अवरूद्ध पद्धत, शुद्ध सामाजिकीकरण प्रक्रियेचा अभाव, योग्य काळजी घेण्याच्या पद्धतींचा



अभाव, शिक्षणाचा अभाव या दबावाखाली मुलं येतात आत्महत्या करून आपले जीवन संपवून टाकतात. महाराष्ट्र, तामिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये पालक आपल्या मुलांना केवळ विज्ञान आणि गणित घेऊनच अभ्यास करायला लावतात, त्यांना इंजिनीअर, डॉक्टर बनवण्याची हौस नेहमीच असते. मुलांची वाणिज्य किंवा कला या विषयातील आवडीच्या निवडीकडे दुर्लक्ष केले जाते. मुलांच्या अभ्यासात पालकांचा जास्त हस्तक्षेप सुरू होतो. महाराष्ट्र, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेशात मुलांवर अभ्यासाच्या दबावामुळे आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. आत्महत्येची मानसिक कारणे - पालकांच्या आपुलकीचा अभाव, पालकत्वाची व्यवस्था अवरुद्ध, शुद्ध सामाजिकीकरण प्रक्रियेचा अभाव, पालक किंवा कुटुंबाची अपेक्षा किंवा तिरस्काराचे वर्तन, स्पर्धात्मक परिस्थिती, पालकांना किंवा पालकांना बाल मानसशास्त्राचे ज्ञान नसणे, पालकांना समुपदेशनाची योग्य तरतूद, व्यक्तिमत्व विकास/प्रेरक विकास/मुलाच्या आयुर्मान विकासासाठी कुशल प्रशिक्षणाची उपलब्धता नसणे, मनोरंजनाचा अभाव, कौटुंबिक आपुलकीचा अभाव, कौटुंबिक विघटन, मुलांवर सोशल मीडियाचा नकारात्मक प्रभाव, पालक/कौटुंबिक पालकांशी मैत्रीपूर्ण संबंध नसणे, अभाव मुलांकडे लक्ष न देणे, मुलांच्या वर्तनाची योग्य समज नसणे, सहानुभूतीपूर्ण वागणूक नसणे, सहकार्याचा अभाव, पालकांच्या नेतृत्वाचा अभाव, चुकीचे समाजीकरण, निराशा, अति भावनिकता, उन्माद, मानसिक दुर्बलता, निराशा, अतिसंवेदनशीलता, परीक्षेत अपयश, स्पर्धा परीक्षांमध्ये अपयश.ही सर्व कारणे मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्रॉईड यांनी आत्महत्येची कारणे सांगितली आहेत.. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार, आत्महत्येचा वाढीचा दर ६.२% आहे तर वाढीचा दर दरवर्षी २.१% आहे. परीक्षेत नापास होण्याचे प्रमाण १.७% आहे. भारतातील आत्महत्येच्या पद्धतींमध्ये विषप्रयोग, फाशी, पाण्यात बुडणे इत्यादींचा समावेश होतो. सध्या मुलं अभ्यासाच्या दडपणाखाली जगत आहेत, ती सुखी समाधानासाठी शेवटी आत्महत्येकडे वळतात. मुलांना अभ्यासाच्या दबावापासून मुक्त करण्याचे मार्ग - पालक/पालकांची सकारात्मक विचारसरणी, मुलांचे मित्र/मुलांचे आदर्श म्हणून प्रस्थापित होणे, अंतर्मुख / मुलाच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अडथळा इ. सध्या अभ्यासाच्या दडपणामुळे मुलांमध्ये आत्महत्येचा कल गगनाला भिडला आहे. हे रोजच वर्तमानपत्रातून ऐकायला मिळते. इथे आपण या घटनेसाठी मुख्यत्वे पालक किंवा कुटुंबातील सदस्यांना जबाबदार धरतो. अशा घटनेला समाजीकरणाच्या प्रक्रियेतील सर्व घटक जबाबदार असतात कारण मुलांच्या स्वच्छ व्यक्तिमत्त्वाच्या निर्मितीमध्ये त्यांची भूमिका मुख्य असते. कुठेतरी मुले आत्महत्या करत आहेत, मग संपूर्ण पालक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. जर मुलांमध्ये उदासीनता, असामान्य थकवा, भूक न लागणे, निद्रानाश, वारंवार डोकेदुखी,पोटात दुखणे, मळमळ, नकारात्मकता, मूड बदलणे, आक्रमकता, सामाजिक माघार, समवयस्कांशी संवाद न करणे, अस्वस्थता, बंडखोरपणा, धूम्रपान, मादक पदार्थांचा गैरवापर, शाळेतील बेफिकीरपणा, बंकिंग, कामावर खराब कामगिरी, लक्ष केंद्रित करण्यास असमर्थता, चिंता, भीती, शाळांमध्ये वारंवार सुटी घेणे, भावनांनी भरलेली इत्यादी परिस्थिती प्रथमदर्शनी मुलांच्या मनातील सतत तणाव/संघर्षाची स्थिती दर्शवते. मुलांमध्ये तणावाची स्थिती शरीरात कॉर्टिसॉल तयार करते ज्यामुळे हळूहळू नैराश्य येते आणि जेव्हा ते जास्त होते तेव्हा ते आत्महत्या करतात. पालकांनी किंवा समाजीकरण प्रक्रियेतील इतर लोकांनी मुलांच्या बौद्धिक विकासानुसार आणि मित्र बनून नेहमी सकारात्मक अभिव्यक्तीसह मार्गदर्शन करणे आवश्यक आहे जेणेकरून मुलांचा संतुलित विकास होईल. आत्महत्येच्या घटनेनंतर पालकांना आपल्या चुका आठवतात आणि पश्चात्ताप होतो, हे पैलू आपल्या जीवनात आत्मसात करण्याची गरज आहे, जेणेकरून पालकांना गोड नातेसंबंध असलेल्या मुलांच्या विकासासाठी दूरगामी मदत करता येईल आणि विद्यार्थ्यांच्या व आपल्या पाल्यांच्या शोकांतिकेतून आपण सर्व मुक्त होऊ या.

# रक्षाबंधन



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**रक्षाबंधन हा सण भावाबहिणींचा सण म्हणून ओळखला जातो.राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात.यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखी पौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण आहे.यामुळे बहिण-भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते.भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते.**

उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्चिम भारतामध्ये"नारळी पौर्णिमा"या नावाने हा सण साजरा केला जातो.पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते. श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्राव थांबवला. तेव्हापासुन श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले.म्हणजेच रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत सुरू आहे.यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो.अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात. चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती.राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी "जान जाये पर वचन न जाये"अशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.रक्षाबंधन म्हणजे बहीण -भावाच्या अतुट बंधन.म्हणजेच बहिण-भावाच्या नात्याचा सुवर्ण महोत्सव.कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावुन येण्याचे वचन देतो.यामुळे बहिण -भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते.सध्या बहिण -भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी परंतु सोबतच



एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे.कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होतांना दिसत आहे.यामुळे अनेक पशुपक्षांचे जगणे कठीण झाले आहे व काही पशुपक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा परंतु हवामानात बदल झाल्याने मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे प्रमाणा सुध्दा वाढले आहे.यामुळे मानवी हानी, शेतीचे नुकसान, समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी,भुकंप, वादळ,विजकोसळने,अती उष्णता,अती थंडी ह्या संपूर्ण घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते.परंतु आपण येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो.याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे.त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात.परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक -एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे.यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल,भुकंपावर आळा बसेल, अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक,सण उत्सव, राष्ट्रीय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे.कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बद्दल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळते.त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्त भर देण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणांचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# छत्रपती शिवरायांच्या भूमीत राहुल गांधींच्या सत्काराची तयारी पूर्ण : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशातील हुकुमशाही मोदी सरकारने काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांच्यावर राजकीय सुडबुद्धीने कारवाई केली पण राहुल गांधी मोदींच्या हुकुमशाहीला न डगमगता निर्भीडपणे सामोरे गेले. देशभरात भितीचे वातावरण असताना 'डरो मत' असा संदेश देणाऱ्या राहुल गांधी यांचा सत्कार छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमी असलेल्या महाराष्ट्रात करावा, ही काँग्रेसची भावना होती म्हणूनच मुंबईत १ सप्टेंबरला काँग्रेस पक्षाच्या वतीने जननायक राहुल गांधी यांचा भव्य सत्कार केला जाणार आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.



दादर येथील टिळक भवन या काँग्रेस कार्यालयात राहुल गांधी यांच्या सत्काराच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर नाना पटोले प्रसार माध्यमांशी संवाद साधत होते. ते पुढे म्हणाले की, राहुल गांधी यांच्यावर खोटे आरोप करुन त्यांची खासदारकी रद्द केली, त्यानंतर त्यांना सरकारी घरही खाली करावयास भाग पाडले पण राहुल गांधी मागे हटले नाहीत. मा. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर मोदी सरकारला राहुल गांधी यांची खासदारकी बहाल करावी लागली. मोदी सरकारवरील अविश्वासदर्शक ठरावात भाग घेत राहुल गांधींनी मोदी सरकारवर तुफान हल्ला केला. मणिपूरच्या मुद्द्यावर मोदी सरकारवर तोफ डागली. देशातील हुकुमशाही कारभाराला सडेतोड उत्तर देणाऱ्या राहुल गांधी या काँग्रेसच्या निडर योद्ध्याचा सत्कार १ सप्टेंबरला संध्याकाळी ५ वाजता केला जाणार आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, संघटन महासचिव के. सी. वेणुगोपाल यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते यावेळी उपस्थित राहणार आहेत. महाविकास आघाडीमध्ये लोकसभेच्या जागा वाटपावरून कोणतीही स्पर्धा नाही वा वादही नाहीत. उद्धव ठाकरे यांनीही मेरिटनुसार जागा वाटप होईल हे स्पष्ट केले असून काँग्रेस पक्षाचीही तीच भूमिका आहे. मोदी सरकारचा पराभव करणे हाच मविआचा उद्देश असून ही आघाडी त्यावर भर देत आहे, असे नाना पटोले यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

पृथ्वीराज चव्हाण यावेळी म्हणाले की, इंडिया आघाडीच्या बैठकीवर भाजपाकडून होत असलेली टीका हास्यास्पद आहे. देशभरातील २८ पक्ष मोदी सरकार विरोधात एकत्र आले आहेत, बंगलुरु मध्ये इंडिया आघाडीची दुसरी बैठक होत असतानाच नरेंद्र मोदी यांनी घाईघाईने एनडीएची बैठक बोलावली. इंडिया आघाडीची ताकद पाहून मोदी व भाजपा घाबरलेले आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मोदींविरोधात ६२ टक्के लोकांनी मतदान केले होते. यावेळी मतांचे विभाजन होऊ द्यायचे नाही असे विरोधी पक्षांनी निश्चित केले आहे. इंडिया आघाडी भक्कमपणे उभी आहे म्हणून भाजपाकडून मतविभाजन व्हावे यासाठी BRS सारख्या पक्षांना पुढे केले जात आहे. राज्यातील भाजपाप्रणित शिंदे सरकारमध्ये अंतर्विरोध आहे. या सरकारला एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला तरी अजून त्यांना पालकमंत्री नियुक्त करता आले नाहीत, मंत्रिमंडळ विस्तार करता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. निधी वाटपावरूनही सत्ताधारी पक्षांमध्ये वाद सुरु आहेत. सरकारधील वादाचा फटका शेतकरी, तरुण, कामगार, व राज्यातील गुंतवणूकीवर होत आहे. महाराष्ट्रात अस्थिर राजकीय परिस्थिती असल्याने कोणताही मोठा गुंतवणुकदार येत नाही. वेदांता फॉक्सनसारखा मोठा प्रकल्प राज्याबाहेर गेला. आताही ऍपल कंपनीने ५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक तामिळनाडू, कर्नाटक राज्यात केली आहे. यामुळे राज्यातील तरुण रोजगारांपासून वंचित राहत आहेत. कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क वाढवल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. जपान, चीन मध्ये कांदा २००-३०० रुपये किलो आहे, कांदा निर्यात केला तर शेतकऱ्याला जास्त पैसे मिळतील म्हणून केंद्र सरकारने तात्काळ निर्यात शुल्क रद्द करावे, अशी मागणी पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे. या पत्रकार परिषदेला माजी मंत्री व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, महिला प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, सोशल मीडियाचे राज्य प्रमुख विशाल मुत्तेमवार, प्रदेश प्रवक्ते भरतसिंह आदी उपस्थित होते.

# मृतदेह नेणाऱ्या वाहनाचा अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** एका दुदैवी घटनेने चंद्रपूर जिल्हा पुरता हादरला आहे. चंद्रपूर येथून छत्तीसगड येथे मृतदेह घेऊन जाणाऱ्या स्कॉर्पिओ वाहनाचा भीषण अपघात झाला.या अपघातात एकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना चंद्रपूर- मूल मार्गावरील जाणाळा येथे आज घडली.सचिन मोहन साखरे असे मृतकाचे नाव आहे. करण शाहू, अन्वजित सहारे अशी जखमीची नावे आहेत. जखमीना उप जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हळविण्यात आले आहे.

छत्तीसगड राज्यातील केसव यादव हा मजूर चंद्रपूर येथे मजुरीसाठी आला होता. अचानक त्याची प्रकृती बिघडली. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्याचा मृतदेह नेण्यासाठी कुटुंबीय चंद्रपूरला आले होते. आज स्कॉर्पिओ गाडीने मृतदेह घेऊन जात असताना वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटले अन रस्त्यावरील पुलाचा कठड्याला जोरडार धडक दिली. या धडकेत एकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर दोघे गंभीररित्या जखमी झाल्या आहेत. ही घटना मुल - चंद्रपूर महामार्गावर मुल पासून अवघ्या सात किलोमीटर अंतरावर असलेल्या जाणाळा गावा नजीकचा वळणावर घडली. सचिन मोहन साखरे असे मृतकाचे नाव आहे. घटनेची माहिती मुल पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठले. जखमींना मुल उप जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले. करण शाहू, अन्वजित सहारे अशी जखमीची नावे आहेत. पुढील तपास मूल पोलीस करीत आहेत.



# गँगवार रोखण्याचे हंसराज अहीर यांचे निर्देश

## पीडित, ग्रामीण नागरिकांच्या तक्रारीनुसार आयोगाद्वारे सुनावणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** यवतमाळ व अन्य जिल्ह्यांमधील वेकोलि खाण क्षेत्रात, क्षेत्रालगतच्या वसाहती तसेच ग्रामिण भागात वेकोलि अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षीत व बेजबाबदार वृत्तीमुळे कोळसा चोरींचे प्रमाण वाढले असुन यातून टोळ्या-टोळ्यांचे माध्यमातून अवैध धंद्यांना प्रोत्साहन मिळाल्याने गंभीर स्वरूपाच्या गुन्हयांमध्ये वाढ झाली आहे. या क्षेत्रात गँगवार, खुनीसंघर्ष व निर्घृण हत्यांसारखे प्रकार राजरोसपणे सुरू असल्याने वेकोलि क्षेत्रांमध्ये आधुनिकीकरणाचा अवलंब करून ड्रोनद्वारे निगरानी तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे निर्देश राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी वेकोलि प्रबंधनाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना सुनावणी दरम्यान दिले. उपरोक्त विषयाला घेवून त्रस्त मागासवर्गीय नागरीक तसेच ग्रामिण क्षेत्रातील प्रकल्पपिडीतांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीची गांभिर्याने दखल घेवून मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी दि. 25 ऑगस्ट 2023 रोजी क्षेत्रीय कार्यालय वेकोलि घुग्गुस येथे सुनावणी घेत या प्रश्नी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. एनसीबीसी अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सुनावणीला वेकोलिचे अध्यक्ष तथा प्रबंध निदेशक मनोज कुमार, चंद्रपूरच्या अतिरीक्त पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, यवतमाळचे अतिरीक्त पोलिस अधिक्षक पियुष जगताप, वेकोलिचे मुख्य सुरक्षा अधिकारी कमांडंट विक्रांत, वेकोलि वणी चे क्षेत्रीय महाप्रबंधक आभाषचंद्र सिंह, वेकोलि चंद्रपूर क्षेत्राचे महाप्रबंधक संजय वैरागडे, वणी नॉर्थ क्षेत्राचे श्रीवास्तव, माजरी क्षेत्राचे इलियाज हुसैन यांची या सुनावणीला प्रामुख्याने उपस्थिती होती.

पेट्रोलिंग व शस्त्रसज्ज सुरक्षा रक्षकांच्या संख्येत वाढ करीत स्थानिक पोलिस विभागाशी समन्वय व संपर्क प्रस्थापित करीत त्यांच्या सहकार्याने वेकोलि क्षेत्रातील चोऱ्या व गुन्हेगारीवर अंकुश घालण्याचे निर्देश दिले. वेकोलि क्षेत्राच्या 10 किमी अंतरावर स्क्रॅपच्या दुकानांना अनुमती देवू नये याकरिता वेकोलि प्रबंधनाने निवेदनाव्दारे संबंधितांकडे मागणी करावी, वेकोलिच्या अनेक क्षेत्रामध्ये अजुनही चोऱ्यांचे प्रमाण जैसे थे सुरू असल्याने वेकोलि प्रबंधनाने ड्रोन एजन्सीद्वारा न घेता स्वतः ड्रोनची खरेदी करून या अनुचित घटनांवर नियंत्रण ठेवावे, ज्यादा मनुष्यबळ असलेल्या ठिकाणी कामगारांना सुरक्षा कामी नियुक्त करावे अशा सुचना सुध्दा श्री. अहीर यांनी उपस्थित वेकोलि अधिकाऱ्यांना केल्या.



















# वन्यजीव व पर्यावरणाचे रक्षण करणे कर्तव्य कोणाचे



विनायक सुर्यकांत कदम
संपर्क क्र.: ७५०७९१५७०४

आधुनिक केसरी

**समाजातील बरेचसे लोक असे गृहीत धरतात की वन्यप्राण्यांची जबाबदारी ही फक्त वनविभागाची असते. पण वनविभागाच्या ही मर्यादा असतात. ते प्रत्येक गावापर्यंत पोहचेलच असं नाही. यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. वन्यजीव व पर्यावरण यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे जसे शासनव्यवस्थेचे कार्य आहे. त्याचप्रमाणे हे सामान्य जनतेचे देखील कर्तव्य आहे. यांसाठी अनेक कायद्यांची तरतूद करण्यात आली आहे. भारतीय संविधानानुसार अनुच्छेद ४८ अ नुसार वन्यजीव व पर्यावरण यांचे संरक्षण व संवर्धन करणे व अनुच्छेद५१ नुसार आंतरराष्ट्रीय कायदा, करार, संबंध सुधारणा शासनाचे काम आहे.**

याचप्रमाणे अनुच्छेद ५१ अ नुसार वने, सरोवर, नद्या, वन्यजीव सृष्टी व नैसर्गिक पर्यावरण यांचे संरक्षण व संवर्धन करणे आणि प्राणीमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. हे सर्वांच्या योगदानातूनच घडू शकतं.

**महाराष्ट्रातील वन्यप्राणी :** महाराष्ट्रात अनेक प्रकारचे वन्यप्राणी आढळतात. यामध्ये बंगाली वाघ, भारतीय बिबट्या, रानमांजर, तरस, अस्वल, उदमांजर, छोटे कस्तुरी मांजर, कोल्हा, खोकड, रानकुत्रा (ढोल), सायाळ, रानगवा, रानडुक्कर, सांबर, चितळ, नीलगाय, भेकर यांसारखे अनेक मोठ्या आकाराचे सस्तन प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी, उभयचर प्राणी, मासे व इतर वन्यजीव आढळतात. पण यातील काही वन्यजीवांमुळे होणारे पिकांचे नुकसान व त्यांचे हल्ले अशा बातम्या कानावर येतात

**वाघ :** एकटा राहणे व लपून शिकार करणे हे वाघाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. एखाद्या प्राण्यावर हल्ला करायचा झाल्यास तो प्राणी जवळ येण्याची वाट पाहतो. वाघ व इतर मांजर कुटुंबातील प्राणी खूप लांब अंतरापर्यंत भक्ष्याचा पाठलाग करत नाहीत. पूर्वी वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. काहींचे असे मत होते की ते वाघ लाखोंच्या संख्येत होते. पण त्यांची शिकार, अवयवांची तस्करी यांमुळे त्यांची संख्या झपाट्याने कमी होत गेली. काही राजे-महाराजे व ब्रिटिशांच्या काळात हे अतिशय मोठ्या प्रमाणावर घडले. त्यामध्ये भारतात वाघांची संख्येत २०१० मध्ये १८०६, २०१४ मध्ये २२२६, २०१८ मध्ये २९६७, २०२२ मध्ये ३६८२ अशी वाढ झाली.

**बिबट्या :** मांजर कुटुंबातील सर्व वन्यजीव लपून शिकार करतात ते शिकार जवळ येण्याची वाट पाहतात व लगेच झेप घेऊन हल्ला करतात. बिबट्या कायम कमी उंचीच्या प्राण्याची शिकार करतो. शेतात वाकून अथवा बसून काम करणाऱ्या व्यक्तीवर व लहान मुलांवर बिबट्या हल्ला करू शकतो. तो झाडावर चढण्यात तरबेज असतो. त्यामुळे त्यांची नखे अतिशय तीक्ष्ण असतात.

कधी कधी झाडावरून खाली उडी मारून शिकार करतो व आपली शिकार पुन्हा झाडावर नेतो व तिथेच खातो. बिबट्या स्वतः ला कोणत्याही वातावरणात सामावून घेतो.

**अस्वल :** महाराष्ट्रात आढळणारी अस्वलाची प्रजाती अतिशय आळशी असते असं समजलं जातं. म्हणूनच त्याला इंग्रजीमध्ये स्लॉथ बेअर (आळशी अस्वल) म्हटले जाते. वाळवी व मुंग्या यांचा मोठ्या प्रमाणात आहारात समावेश असतो. परंतु धोका जाणवल्यास मागील दोन पायांवर उभे राहतात व हल्ला देखील करू शकतात. डोळ्यांची नजर फारशी चांगली



नसल्याने ते नाकाने आजूबाजूच्या परिस्थितीचा आढावा घेतात. हे एकटे राहणे पसंत करतात.

**गवा :** मादी या कळपात राहतात. तर नर इतर नरांसोबत किंवा एकटे राहतात. नर मादीपेक्षा आकाराने मोठे असतात. हे शाकाहारी असतात. यांच्या जवळ जाणे धोक्याचे ठरू शकते. अचानक त्यांच्या समोर गेल्यास व जवळ जाऊन जास्त प्रमाणात हालचाल, ओरडल्यास ते आक्रमक होऊ शकतात. शेतकरी यांच्या मुळे त्रस्त होतात. कारण हे अनेकदा शेतीचे नुकसान करतात.

यांसारखे इतर वन्यप्राणी जसे की रानडुक्कराचे मनुष्यावरील हल्ले, नीलगाय यांमुळे शेतीचे नुकसान, सर्पदंश यांसारख्या अनेक घटना घडत आहेत.

**मानव :** वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना जेव्हा एखाद्या गोष्टी विषयी आपण जेव्हा माहिती घेतो तेव्हा आपण अधिक जागरूक व सतर्क राहतो. आपल्या मनातील भीती कमी होते, शंकांचे निरसन होते. यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृतीची आवश्यकता आहे.

* यांची सुरूवात विद्यालय, महाविद्यालयांतून केली पाहिजे.

मुलांमध्ये वन्यजीवांविषयी आवड निर्माण व्हावी.

* गावागावांत वन्यप्राण्यांचे छायाचित्रे व त्यांविषयीची माहिती लोकांपर्यंत पोहोचवली पाहिजे.

* वन्यप्राण्यांचा वावर असलेल्या ठिकाणी एकटे जाऊ नये.

रात्री बाहेर जाणे टाळावे, आवश्यक असल्यास एखाद्याला सोबत घ्यावे.

* रात्री बाहेर पडताना बॅटरी, मोबाईल वर गाणी लावली.

* कोणत्याही वन्यप्राण्यांच्या अचानक समोर जाऊ नये. प्राण्यांना आपल्या येण्याची चाहूल लागताच ते आपल्या पासून दूर जाणे पसंत करतात.

* स्वतःहून कोणत्याही वन्यप्राण्यावर हल्ला करू नये. मर्यादा त्याच्या मार्गाने जाऊ द्यावे.

* प्रत्येक प्राणी आपल्या जवळ न येण्याचे वेगवेगळे इशारे करतो. उदा. मान हालवणे वेगवेगळे आवाज काढणे, शेपटी वेगवेगळ्या प्रकारे हालवणे, इ. ते लक्षात घेऊन त्यापासून दूर जावे.

# लोककल्याण सामाजिक संस्था गरिबांचं न्यायालय



सुरज रामचंद्र अंगुले
संपर्क : ७७१९८७६३१३

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात सामाजिक संस्था अनेक आहेत त्यापैकी धाराशिव जिल्ह्यात उमरगा तालुक्यातील कोराळ या छोट्याशा खेडेगावात लोककल्याण बहुउद्देशीय सामाजिक संस्थेची १९ फेब्रुवारी २०१९ साली छत्रपती शिवाजी महाराज जयंतीदिनी औचित्य साधून संस्थापक अध्यक्ष विक्रम दासमे यांनी समाजाच्या हितासाठी स्थापना केली.युवकांनी त्यांचा आदर्श घ्यावा असेच कार्य आहे. शेतकरी,अपंग,गोरगरिबांचे ते निस्वार्थीपणे नेहमी कामे करत असतात म्हणून त्यांचा आम्हाला अभिमान वाटतो.कोणताही स्वार्थ न साधता ही संस्था ओतप्रोत कार्य करीत आहे.अपंग, बेरोजगार, शेतकरी यांची कामे अगदी सहज करून समाजकार्याचा वसा हाती घेतला आहे.लेखाद्वारे कार्य मांडेल तेवढे कमीच आहे. असे तरूण युवक महाराष्ट्रात जन्म घेतले तरच माणुसकीचा पुनःजन्म होईल असे मला वाटते.**

निधड्या छातीच्या ढाण्या वाघाला आयुष्य देवाने भरपूर देवो असे मागणे मी देवाला दि.२३/११/२०२३ रोजी पुण्यात भक्ती शक्ती येथे जाऊन साकडं घातलं होतं.

कोराळ गावातील अंगणवाडी मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खावुचे वाटप केले.तसेच गावातील निराधार लोकांना मायेची ऊब म्हणून ५१ लोकांना चादरीचे व आयुर्वेदीक औषधी चे वाटप केल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा होता तो आनंद ते कधीही विसरू शकत नाहीत.कारण तो आनंद म्हणजे मुलंही देवाघरची फुलं आहेत. म्हणून चिमुकले खुप आनंदी होते.या सर्व उपक्रमास संस्थेचे सचिव रवि दासमे यांची उत्तम साथ लाभल्याने समाजासाठी कायमस्वरूपी मदत,न्याय आणि माणुसकीचं जीवंत दर्शन नेहमी देऊ असे ते सहज बोलून दाखवले आहेत."मि माझ्यासाठी नाही तर मी तुमच्यासाठीच आहे" असं काम संस्थेच आहे.तळगळातील विविध प्रश्नांवर कार्य करणारी ही संस्था आणि संस्थेचे अध्यक्ष विक्रम दासमे हे एखाद्या खासदार,आमदाराला जमणार नाही अशी युक्ती लावून ते काम करत असतात. प्रज्ञा,शिल,करुणा त्यांच्या कार्यात दिसून येते. यामुळेच ते युवकांचे मार्गदर्शक,प्रेरणास्थान आणि आधारस्तंभ ठरत आहेत.

पाणी हे जीवन आहे याचा अर्थ या संस्थेला समजल्यानंतर संत तुकाराम महाराज बिजोत्सवानिमित्त अखंड पारायण सप्ताहात भाविक भक्त व बाहेरून आलेल्या नागरिकांना तसेच वारकर्यांना पाण्याची सोय व्हावी म्हणून पाणपोई चे आयोजन गेली पाच वर्षे झाली या संस्थेच्या माध्यमातून कोराळ गावात उपक्रम राबविण्यात येतो.या उपक्रमातून हजारों भाविकांचा आशीर्वाद या संस्थेने मिळवून आपला ठसा उमटवला आणि काम हे ईश्वर आहे असं दाखवून दिलं अशी बरेच कामे ते करत असतात म्हणून वैचारिक बांधिलकी त्यांच्यात स्पष्ट दिसून येते.सलग पाच वर्षे निस्वार्थ सेवा करत आहेत.हीच खरी भक्ती म्हणायला हरकत नाही.संस्था स्थापन करणे म्हणजे पैसा जमा करणे नसून समाजाच्या कल्याणाकरीता संस्था काम करणे होय.ती संस्था म्हणजे लोककल्याण बहुउद्देशीय सामाजिक संस्था कोराळ या गावची आहे.कोरोना महामारीच्या काळात रोग वेगाने पसरू नये म्हणून या संस्थेने एक युक्ती लढवली ती म्हणजे जनसमुदाय सार्वजनिक ठिकाणी एकत्र बसू नये म्हणून कट्टे वट्टे अशा इतर ठिकाणी काळ तेल टाकून लोकांना एकत्र बसण्यापासुन दुर केल गेल हा पहिला प्रयोग या संस्थेने केला आणि याची दखल घेत हा उपक्रम जिल्हाभर अनेकांनी राबविला.त्या काळात रोग नियंत्रणात येण्यास शासनाला मदत झाली.कोरोनाच्या पहिल्या टप्प्यातील काळात गावातील नागरिकांना डोअर टू डोअर जावून आर्सेनिक अल्बम ३० गोळ्यांचे वाटप असेल तर दुसर्या टप्प्यातील काळात गावातील १८०० नागरिकांची घरोघरी जाऊन शरीरातील तापमान आणि ऑक्सिजन लेवल तपासणी केली. स्वतःच्या जिवाची पर्वा न करता या कोरोना महामारीच्या काळातील महाराष्ट्रातील एकमेव सामाजिक संस्था आहे हे अवघ्या महाराष्ट्राने पाहिलेलं आहे.याच काळात संस्थेच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.याचा फायदा जीवन अंतिम टप्प्यात असणार्या लोकांना झाला आणि त्यांच्या आशीर्वादाने आजही संस्था जोमाने काम करत आहे.हे त्यांचं त्याज्य दिवस आहेत.संस्थापक नावाप्रमाणे आहेत ही एक विशिष्ट वैशिष्ट्य आहे आणि योगायोग आहे.संस्थेचे अध्यक्ष श्री.विक्रम दासमे यांच्या वाढदिवस १७ मे रोजी निवासी अपंग शाळा सास्तुर येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य,बिस्किटे,फळे,मास्क,सॅनिटायझर मोफत वाटप करुन साजरा झाला व तो दरवर्षी होतो.असे अनेक कामे त्यांनी केली आहेत त्यांचा आदर्श घ्यावं तेवढे कमी आहे.अशी माणसे क्वचितच मिळतात.

शेतकऱ्यांच्या कल्याणाकरीता मोफत पिकविमा फॉर्म भरून देऊन सहकार्य करत असतात.दुसरी कडे फॉर्म भरायला १५० रुपये घेतात पण ही संस्था दरवर्षी ५०० ते ६०० शेतकऱ्यांना मोफत ऑननलाईन पिकविमा फॉर्म भरून मदत करते.कोणतीही अपेक्षा न ठेवता निस्वार्थी कार्यामुळे माणुसकीचा झरा निर्माण झाला आहे.आपलेपणा यात सहज दिसून येत आहे. जगाचा पोशिंदा जगला पाहिजे म्हणून कोणत्याही अडचणीत ही संस्था नेहमी धावून आली आहे. त्याचबरोबर एक हात मदतीचा उपक्रम राबवून निवासी अपंग शाळेतील विद्यार्थ्यांना दरवर्षी दिवाळी फराळ वाटप करून त्यांच्याबरोबर दिवाळी साजरी केली जाते. तसेच दिवाळीचा पहिला दिवा छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात लावून शिव-भीम दिपोत्सव साजरा करण्यात येतो.१० वी,१२ वीतील येणेगुर,कोराळ,सुपतगाव येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करून प्रेरणादायी कामे केली जातात.लोककल्याण संस्थेच्या माध्यमातून सततचा पाठपुरावा करून गावातील ७ लोकांना पंचायत समिती अंतर्गत विहीर मंजूर करून देण्यात आले.त्याची रक्कम २१ लक्ष रूपये एवढी आहे.भुंकपग्रस्ता विषयी अन्याय,बेरोजगार तरुणांना रोजगार निर्मिती साठी उपक्रम अशी धडाडीची व चमकदार कामगिरी या संस्थेनं केली आहे.

त्यांची कामगिरी पाहुन २०१९ चा येणेगुर फेस्टिवलचा राज्यस्तरीय युवारत्न पुरस्कार मिळाला. कोरोना काळातील कामगिरी पाहुन पुणे येथील ज्ञानसंकल्प संस्थेचा,पत्रकार संघाचा तसेच इतर संस्थाचा त्यांना राज्यस्तरीय कोरोना योद्धा पुरस्कार मिळाला.बेरोजगार तरुणां विषयी काम केल्यामुळे त्यांना प्रथम एज्युकेशन फॉऊडेंशन चा राज्यस्तरीय बेरोजगार मुक्त युवा पुरस्कार मिळाला.अशी अनेक पुरस्कार त्यांच्या नावावर आहेत.महाराष्ट्र शासनाने या संस्थेची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात यावं असे तरुणाईच्या मनाला नेहमी वाटतं असते.अशी संस्था पुन्हा महाराष्ट्रात होऊ शकत नाही.विक्रम दासमे सारखे माणसं गावागावात झाली तर प्रश्न नावाचा शब्द उद्भवणार नाही.असे योद्धे कुठलेही काम सहज वार करून पेलतील.यामुळे या संस्थेचे व संस्था अध्यक्ष विक्रम दासमे यांच्या कार्य असेच वाढत जावो व त्यांचा हातून अनेकांची सेवा घडत रहावो ही आई तुळजाभवानी चरणी प्रार्थना करतो.

# बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सण राखी पौर्णिमा

आधुनिक केसरी

श्रावण पौर्णिमा आजचा दिवस संपूर्ण देशात राखी पौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. राखी पौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील एक महत्वाचा सण मानला जातो. बहीण भावाच्या पवित्र नात्याला बंधनात बांधणारा हा सण. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊ देखील आपल्या लाडक्या बहिणीला तिच्या आवडीची भेट देऊन तिला तिच्या सुरक्षेची हमी देतो त्यामुळे या सणाची बहीण भाऊ दोघेही आतुरतेने वाट पाहत असतात. विशेषतः जे बहीण भाऊ एकमेकांपासून लांब असतात त्यांना या निमित्ताने एकमेकांची भेट घेता येते. आपली सुख दुःख एकमेकांना सांगता येतात आणि जुन्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळतो. राखी पौर्णिमा या सणाला पौराणिक इतिहास आहे. पुरातन काळात जेंव्हा स्त्री स्वतःला असुरक्षित मानत होती तेंव्हा ती अशा व्यक्तीस राखी बांधून भाऊ मानत असे जो तिची रक्षा करील. इंद्राच्या राणीने आपल्या मनगटावर एक धागा बांधला होता. ज्याच्या समर्थ्याने वज्रासुर राक्षसाचा पराभव केला तेव्हापासून त्याची स्मृती म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत सुरू झाली असे मानले जाते. तसेच ऐतिहासिक काळात चित्तोडच्या राणी कर्मवतीने हुमायून बादशहाला राखी पाठवली व हुमायून बादशहाने देखिल आपल्या या बहिणीचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले. राखी पौर्णिमेचे असे अनेक दाखले पुराणात आणि इतिहासात पाहायला मिळतात. राखी पौर्णिमेला रक्षा बंधन असेही म्हणतात. राखी बांधण्याचा अर्थ आपण त्या व्यक्तीच्या बंधनात स्वतःला वाहून घेऊन तिच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो. राखी पौर्णिमेच्या दिवशी राखीचा धागा बांधून भाऊ बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो म्हणूनच या सणाला रक्षा बंधन असेही म्हणतात. रक्षा करणे जबाबदारी स्वीकारणे. या दिवशी भाऊ आपल्या बहिणीची जबाबदारी स्विकारतो. वडीलांच्या पश्चात भाऊ आपल्या बहिणीची सर्व परिस्थितीत जबाबदारी स्वीकारतो तर आईच्या पश्चात भावास आईचे निरपेक्ष प्रेम देणे, काळजी घेणे याची जबाबदारी बहीण स्वीकारते म्हणून याला रक्षा बंधन असे म्हणतात. या दिवशी बहीण आणि भाऊ एका पवित्र बंधनात बांधले जातात म्हणून या सणाला बहीण भावाच्या पवित्र नात्याच्या सण असे म्हटले जाते. राखी बंधनाच्या या पवित्र सणातून मित्रत्व, स्नेह व परस्पर प्रेम वृद्धिंगत होते. आपल्या संस्कृतीत स्त्रीला देवी मानले जाते. अशी ही देवतुल्य स्त्री म्हणजे बहीण आपल्या भावाला राखी बांधण्यापूर्वी त्याच्या कपाळावर टिळा लावते. हा टिळा फक्त मस्तकाच्या आदरचा नसून भावाच्या मस्तकातील सदविचार व सदबुद्धि जागृत राहण्यासाठीची ही पूजा असते. राखीचा धागा हा नुसताच सुताचा धागा नसून ते शील, स्नेह, पवित्रतेचे रक्षण करणारे, सतत संयमी ठेवणारे पुरुषार्थाचे बंधन आहे. ह्या एव्हढ्याशा धाग्याने कित्येक मने जुळून येतात. त्यांना भावनांचा ओलावा मिळतो व मन प्रफुल्लित होतो. एकमेकांना जोडणारा हा सण सामाजिक ऐक्याची भावना जागृत ठेवणारा आहे. रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त आपल्या मनाप्रमाणे नाती जोडण्यास ह्या सणामुळे समाजास वाव मिळतो. ज्याला सख्खी बहीण नाही किंवा जिला सख्खा भाऊ नाही ती बहीण मानस भावाला राखी बांधते आणि बहीण भावाचे पवित्र नाते वृद्धिंगत करते असा हा बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सणाच्या शुभेच्छा!

माधव बैलकवाड

# हिंदु-मुस्लिम एकतेचं प्रतीक : रक्षाबंधन

आधुनिक केसरी

**श्रावणमास पर्व हे समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. रक्षाबंधन हे एक सामाजिक व धार्मिक पर्व आहे. हे पर्व सामाजिक परंपरेमध्ये सद्भाव, स्नेह, आत्मियता, बंधुभाव, कौटुंबिक एकात्मता यांचा प्रवाह निर्माण करणारे आहे. खऱ्या अर्थाने संस्कृतीला समृध्द बनविणारे, आध्यात्मिक स्पर्शाने जनमनाला पुलंकित करणारे पर्व आहे, रक्षाबंधन पर्व ! राणी कर्णावतीने आपल्या रक्षणासाठी हुमायुँ राजाला भाऊ मानून बांधलेली राखी इतिहासाच्या पानावर कोरल्या गेली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील स्नेह व एकी निर्माण करणारी ही जीवंत साक्षच आहे. 'स्त्री' जातीच्या रक्षणासाठी धर्म, जाती, लिंग या भेदांना छेदून पुढे टाकलेले एक पाऊल आहे हे! राष्ट्रीय एकात्मेला पोषक व वर्धक प्रसंग समाजात सद्भावना व सत्प्रवृत्तींचे पोषण करण्याचे कार्य करतात. आपल्या भाऊरायाला बहीण राखी बांधते व आपल्या रक्षणाची अप्रत्यक्षरीत्या हमी घेते.**

हिंदू संस्कृतीतील समाजमुल्यांचे पोषण करणारी ही सामाजिक परंपरा आजही मोठया दिमाखाने देशात सर्वत्र नांदतांना दिसतआहे.

रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडुन मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. शेवटी श्रध्दा खरी ठरली आणि इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते.

हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला कारण भगवान कृष्णाने अनवधानाने स्वतःला जखमी केले होते. अशा प्रकारे, भाऊ आणि बहीण आणि भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन दिले. राखी बांधताना बहिणीने म्हणावे, - येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः। तेन त्वामनुबध्नामि रक्षे मा चल मा चल।। (दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होत तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे.)

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला भरती येतेवेळी त्याला शांत करण्यासाठी नारळानी पुजा केली जाते किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला "रक्षाबंधन" म्हणतात.

या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो.हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पोर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हटले आहे. या विधीस 'पवित्रारोपण' असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते.

उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळो अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे.

बहीण या दिवशी भावाला ओवाळून त्याचा हातावर राखी बांधते आणि आपले भावाविषयी प्रेम व्यक्त करते. या सणाचे आधारस्तंभ म्हणजे प्रेम, पराक्रम, संयम आणि साहस. निस्वार्थ प्रेमाची व्याख्या म्हणजे भावा-बहिणीचं नातं. पूर्वजांनी भारतीय संस्कृती मध्ये या नात्याच्या पवित्रतेचा महिमा गायला आहे. आपल्या भारत देशाने संस्कृतीचे उत्तम उदाहरण देऊन मानवाला योग्य दिशा प्रदान केली आहे. स्त्री सन्मान हा सुद्धा या सणामधून दिलेला उपदेश होय. फक्त स्त्री हक्क आणि स्त्रीला वरवर सन्मान देणाऱ्या



आतल्या गाठीच्या लोकांना तिचे महत्त्व कळत नाही. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः| यात्रेतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः|' ज्या कुळामध्ये स्त्रीची पूजा, म्हणजेच मान- सन्मान, सत्कार होतो, तेथे सुशील, गुणी व उत्तम मुलं होतात आणि जिथे स्त्री सन्मान नसतो तिथे कुठलीही प्रगती होत नाही. हा विचार लहानपणापासून समाजामध्ये रुजविण्याचा प्रयत्न ह्या सणाद्वारे केला जातो. "राखी" ह्या शब्दातच "रक्षण कर" - "राख म्हणजे सांभाळ" हा संकेत आहे. कुठल्याही कर्तबगार, धाडसी शूरवीराने याचक, दुर्बल, वृद्ध, आजारी, असहाय, अपंग व अबलांचे रक्षण करणे हा धर्म आहे. हेच लक्षात घेऊन याच दिवशी रेशमी धागा अशा करारी पुरुषाच्या हाती बांधून त्याच्याकडून रक्षणाचे अभय घेण्याची ही प्रथा आहे. हे अभय शास्त्राधारे पौरोहित्य करणारे पुरोहित आपल्या यजमानघरी स्वतः सर्वांना राखीचा रेशीमधागा मंत्रोच्चारांसह बांधून देतात. यातला गर्भित अर्थ नात्याचे रक्षण करणे हाच आहे. काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्या पेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे. भारतीय समाजात ऐक्यम आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात. मग तो कोणत्याही जाती-धर्माचा असो, स्नेह बळकट होऊन जातात.

जैन परंपरेमध्ये सातशे मुनींवर दृष्ट प्रवृत्तीने केलेल्या उपसर्गाला दुर करण्याचे कार्य या पर्वमध्ये झाले. जैन लोक रक्षाबंधनाच्या दिवशी जैन मंदिरात जाऊन अभिषेक-पूजन करुन मुनीं प्रती हृदयभाव ठेवून पंडित-पुजाऱ्यांच्या हस्ते राखी बांधून हे पर्व साजरे करतात. धर्मरक्षणाचे चकं कण आहे ते ! प्रथम धार्मीक व नंतर सामाजिक दायित्व पार पाडले जाते. हे पर्वधर्म व धर्मावलय यांच्येशी मातृत्व भावनेतून जोडणारेआहे.संस्कृती व धर्म समर्पणाच्या भावनेला वृध्दिगत करणारे आहे.

श्रमण संस्कृतिमध्ये रक्षाबंधनाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. ईश्वरप्रती समर्पणाची भावना व संस्कृतिचा अत्यंत आदरया भावनांना श्रेष्ठस्थान दिले गेले आहे. सामाजिक दृष्टिकोनातून रक्षाबंधन हे वात्सल्य व बंधुभावाचे परिपाक पर्व आहे.

बंधुभाव व स्नेहवर्धनाचे पाठया पर्वामुळे गिरविले जातात. समाज व धर्म या पेक्षाश्रेष्ठ आहे राष्ट्रधर्म ! म्हणून सामाजिक व धार्मीक अस्तित्व टिकविण्याची आज राष्ट्राचे अस्तित्व टिकविण्याची, त्याचे जतन करण्याची गरजभासत आहे. ही महान जबाबदारी आज आपणांवर आहे. ती नेटाने करणे गरजेचे आहे, त्यामुळेही घडी नीट घट्ट बसेल. रक्षाबंधनाच्या निमीत्ताने पर्यावरणाचे रक्षण, ऑलिम्पिक खेळाडूंना शुभेच्छा आणि स्त्रीभृणहत्या रोखण्याचा संदेश राखीच्या माध्यमातून करण्याचा निर्धार भाऊ-बहिण आणि समस्त भारतीयांनी या नाजुक पर्वावर केला पाहिजे.

-प्रवीण बागडे

# यान चंद्रावर विचार मात्र घाणीतच



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतीय शास्त्रज्ञांनी चंद्रयान यशस्वी करून भारताचा सन्मान जगात वाढवला. चंद्रयान मोहीम यशस्वी झाल्याचा आनंद प्रत्येक भारतीयांनी साजरा केला. कारण तंत्रज्ञानातील प्रगती ही खरोखरच कौतुकास्पद आहे. हे एक भारतीय नागरिक म्हणून कोणीही नाकारू शकत नाही. आपण चंद्रावर आपले वर्चस्व गाजवण्यासाठी सज्ज झालो आहोत. परंतु शोकांतिका अशी आहे की आपण चंद्रवर जाण्याचे स्वप्न बघताना देशातील लोकांचे विचार मात्र आजही घाणीतच आहेत. अनेक लोकांना आज माणसाला माणुस म्हणुन स्विकारण्याची तयारी नाही, माणसाचा विकास बघण्याची हिंमत नाही, माणूस हा माणुसच आहे हेच आजही अनेकांना पचत नाही. अंधविश्वास, थोतांड, भोंदुगीरी याला विरोध करणारा, समता बंधुता व न्याय यावर बोलणारा व्यक्ती देश द्रोही व धर्म द्रोही वाटतो.**

एकीकडे विज्ञानाच्या माध्यमातून तंत्रज्ञान विकसित करून चंद्रावर आपण पोहचलो तरीही डोक्यातील अज्ञान मात्र अजूनही कमी झालेले दिसत नाही. विज्ञानाच्या माध्यमातून तंत्रज्ञानाच्या गोष्टी करणारे लोक उघडपणे अज्ञान, अंधविश्वास, थोतांड पाखंड उराशी बाळगून त्याचा संबध थेट धर्माशी जोडून सर्व सामान्य लोकांना भावनिक बनवले जाते. धर्माच्या नावाखाली अज्ञान, थोतांड, अंधविश्वास, विषमता जोपासुन पोट भरण्याचा धंदा अजूनही लोकांनी कमी केला नाही. धंदा कोणताही करण्यासाठी कोणतेही बंधन नाहीत. कोणताही धंदा करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकांना दिलेला आहे. परंतु तो धंदा वैध्य पाहिजे. यान चंद्रावर गेले आणि देशातील लोक त्या यानाचा संदर्भ आरक्षण व देवाशी जोडत आहेत. अर्थात या दोन्ही गोष्टी व आरक्षण यांचा संबंध तेथे जोडणे म्हणजे केवळ आपल्या अंपग बुद्धीमत्तेचे प्रदर्शन केल्या सारखे होय. सरकार विषेशतः गृहखाते नेहमी म्हणते कि सामाजिक तेढ निर्माण होईल असे वादग्रस्त विधाने सोशल मिडीया वर करणे गुन्हा आहे. मग सोशल मिडिया वर विषमता, अंधविश्वास, पाखंड, थोतांड या विषयी अनेक पोस्ट असतात. आरक्षण व संविधानाला विरोध, समता बंधुता व न्यायाला विरोध करणाऱ्या अनेक पोस्ट शेअर असतात. परंतु त्यावर कोणाचेही लक्ष जात नाही. पण सत्य, आणि विज्ञानवादी बोलुन समता बंधुता न्याय अबादीत रहावा या साठी जे लिखाण करतात किंवा मत व्यक्त करतात त्यांना मात्र आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. लोकांच्या मनात द्वेष तर एवढा आहे की काही लोक जे मेंदूचा कधीच वापर न करता शेण व मुताचे सेवन करून बुद्धीला खुराक देतात ते लोक आरक्षणाला प्रत्येक ठिकाणी विरोध करतात. काही मतीमंद लोक तर म्हणतात इसरो मध्ये आरक्षण असते तर चंद्रयान मोहीम यशस्वी झाली नसती. काही लोक तर बालाजी चे दर्शन घेतले म्हणून चंद्रयान यशस्वी झाले असे म्हणतात. आता या दोन्ही गोष्टी वर जर खरं बोलले तर धर्म विरोध, व राष्ट्रद्रोह तर होणारच सत्य बोलले तर सामाजिक तेढ निर्माण होणारच. पण बोलणेही आवश्यक आहे. आरक्षणाचा विरोध तेच लोक करतात ज्यांनी हजारो वर्षांपासून सर्वच क्षेत्रात स्वतः चे आरक्षण मजबूत केले आणि धर्म व भावनेच्या जोरावर इतरांचे विकासाचे मार्ग बंद केले. आरक्षणाला विरोध का आहे तर आरक्षण समता, बंधुता प्रस्थापित करते. आरक्षण प्रत्येक समुहातील लोकांना विकासाच्या संधी निर्माण करून देते. परंतु ज्यांना लोकांचा विकास होणे, लोक जागृत होणे हेच मान्य नाही ते लोक आरक्षणाला विरोध करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचे वातावरण तयार करतात. आणि हिंदु समुदायातील बहुसंख्य आरक्षणाचे लाभार्थी ज्यांनी आज पर्यंत सर्वच नाकारून माणसिक गुलाम बनवून अज्ञानी ठेवले त्यांच्या सुरात सुर मिसळून स्वतः च्या पायावर दगड मारून घेतात. ज्यांना आरक्षणाचा लाभ आहे, जे आरक्षण मुळे विकासाच्या प्रवाहात आले तेच मतीमंद लोक ही आरक्षणाला विरोध करायला लागतात तेव्हा त्यांच्या बुद्धीची किव येते. जाती व्यवस्थेमुळे माणसाला माणसा जवळ येऊ दिले जात नव्हते. त्यामुळे आरक्षणाच्या माध्यमातून केवळ संधी निर्माण झाली तर काही लोकांना धर्म भ्रष्ट झाल्याचे वाटत असेल. संधीच्या मार्फत लोकांना समान संधी मिळून आर्थिक व सामाजिक विकास होणारा पचणी पडत नाही. आरक्षण मान्य नाही ते लोक मात्र आजही मंदीरातील पुजाऱ्याच्या आरक्षणावर बोलत नाहीत. मंदीरातील हजारो करोडो रुपये सर्वसामान्य लोकांचे ठराविक लोकांच्या च घशात जातात तेव्हा त्यावर कोणीच बोलत नाही. प्रसारमाध्यमे, प्रशासनातील उच्च पदावर एकाच जातीतील लोक आहेत त्यावरही कोणाला काहीच बोलता येत नाही. तेव्हा आरक्षण आणि लोकांच्या पैशाची लुट, शासनाच्या पैशाची लूट काही विषमता वादी लोकांना दिसत नाही याचाच अर्थ त्यांच्या डोक्यात आजही विषमता व द्वेष ठासून भरलेला आहे हेच दिसून येते. वर्णव्यवस्था झुगारून समतेच्या गोष्टी करणारे व समता प्रस्थापित करण्यासाठी लढलेले व लढणारे लोक व त्यांचे विचार यांना पचत नाहीत. म्हणजे समता यांना आजही मान्य नाही. विषमता, थोतांड, पाखंड आणि अंधविश्वास जोपासणारे यांना गुलाम बनवणे सोपे जाते म्हणून असे लोकांना ते आपल्या हाताशी घेऊन याच लोकांमधील जागृत झालेल्या लोकांविरुद्ध उभे करून वातावरण दुषीत केले जाते. सत्य समता नाही तर थोतांड आणि चुकीच्या गोष्टी चे समर्थन करणारे लोकांना आदराचे स्थान



दिले जाते व माणसाला माणुस म्हणणाऱ्यांना दोष दिले जातात. विज्ञानाच्या मार्फत विकसित झालेल्या तंत्रज्ञानाला देव धर्माचा आधार दिला तर विज्ञानवादी व तर्कवादी लोकांना ह्या गोष्टी पटणाऱ्या नाहीत म्हणून ते जर याविषयी बोलले तर देवाला विरोध होतो. परंतु जाणून भुजुन कुठेही अंधविश्वास आणि देवाचे संदर्भ देणाऱ्यांना कधीच आवर घालत नाहीत. म्हणजे आपले विचार आणि आचार आजही घाणीतच आहेत. आपण चंद्रावर किंवा मंगळावरही गेलो तरीही विचार मात्र घाणच असतील तर विकास नेमका म्हणायचा कशाला? देशात आज गरज आहे समतेची, बंधुभावनेची, आज गरज आहे माणसाला माणसाशी माणसा सारखे वागण्याची, आज गरज आहे विज्ञानाच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर करून भारताचे नाव लौकिक करण्याची, जाती धर्म बाजूला सारुन राष्ट्रहीत व मानवहीत जपण्याची. परंतु विषमतावादी लोक आजही माणसाला माणसा पासून दुर करण्याचा व वर्णव्यवस्था निर्माण करून पुन्हा माणसाला गुलाम बनवण्याचा प्रयत्न करतात. म्हणून सामाजिक वातावरण दूषित होण्याची परिस्थिती निर्माण करतात. माणसाला माणूस म्हणून जागृत करणाऱ्या लोकांना विषमतावादी लोक कधीच स्विकारत नाहीत. अंधविश्वास पाखंडावर प्रहार करणारे संत व महापुरुष यांना बिलकुल पटत नाहीत. ज्या संत महापुरूषांनी आपले जिवन मानवतावादी व्यवस्था निर्माण करण्यासाठी खर्ची घातले त्याच संत महापुरूषांचे नावही न घेणारे उलट त्यांच्या विचारांना विरोध करणारे लोक कधीच संस्कृती निर्माण करून शकत नाहीत. त्यांच्या कडून विकृती च निर्माण होते. जातीव्यवस्था, अस्पृश्यता, अंधविश्वास यामुळेच देश अधोगतीला गेला होता परंतु जाती व्यवस्था अस्पृश्यता आणि अंधविश्वास या बद्दल प्रबोधन करून माणसाला जागृत केले गेले म्हणून भारताला जगात ओळख निर्माण झाली आहे. जगात भारताला बुद्धाचा देश म्हणून ओळखतात कारण बुद्धाचे विचार हे चिरकाल सत्य व मानवतावादी आहेत. लोक कल्याणाचे विचार व संस्काराची शिकवण म्हणजे तथागत गौतम बुद्ध होत. परंतु त्या संस्कृती व विचाराची मोडतोड करून बूद्धाला दाबण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु सत्य कधीच लपुन राहत नाही म्हणून संताच्या माध्यमातून, महापुरूषांच्या माध्यमातून बुद्धाचे मानवतावादी विचाराची पेरणी पुन्हा झाली. तर्क आणि विज्ञानावर भर दिला गेला व थोतांड व अंधविश्वास नाकारून सत्याचा शोध घेतला गेला म्हणून आज देशात विज्ञान विकसित झाले. विज्ञान विकसित होण्याचे सर्व श्रेय शिक्षणालाच जाते. शिक्षणाच्या माध्यमातून हे सर्व काही सहज सोपे झाले. ज्यांनी जबरदस्ती शिक्षण स्वतः कडेच ठेवून हजारो वर्षापासून लोकांना गुलाम बनवले, परंतु विज्ञानात प्रगती करू शकले नाही. संविधानाच्या माध्यमातून अंधविश्वास व पाखंड व एकाच वर्गाची मत्तेदारी हानुन पाडली माणसाला माणूस म्हणून वागणूक दिली तेव्हा कुठे विकासाचा सुर्य उगवायला सुरवात झाली. जेथे माणसाने ज्ञान आणि राष्ट्रप्रेम बघायला पाहिजे तेथे लोक नको त्या गोष्टी बघुन आपण विषमतावादी आहोत आणि विषमताच आम्हाला पाहिजे हेच सिद्ध करत आहेत. म्हणजे आपण चंद्रावरही गेलो तरीही आपले विचार आजही घाणच आहेत. माणुसकीला काळीमा फासणारे आहेत. चंद्रयान मोहीमेपेक्षाही आपल्याला आपल्याच देशातील जातीव्यवस्था व द्वेषाच्या भावनेतून निर्माण होणारा कलह थांबण्याची मोहीम राबवणे आवश्यक आहे.

# नैसर्गिक शेतीने वाढते जमिनीची सुपीकता



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**नैसर्गिक शेती ही आपल्या परंपरेशी निगडित असून ती आता काळाची गरज बनली आहे. शेतीच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करून आपण आपल्या अन्नाच्या गरजा पूर्ण केल्या आहेत, पण दुसरीकडे रसायनांच्या अंदाधुंद वापरामुळे आपल्या पृथ्वीवर आणि आपल्या जीवनावर त्याचे खूप दुष्परिणाम होत आहेत. रासायनिक शेतीमुळे पृथ्वीची घटती सुपीकता आणि वाढते प्रदूषण यामुळे संपूर्ण जग चिंतेत आहे. पण त्याचे समाधान आपल्या पारंपारिक शेतीत म्हणजेच नैसर्गिक शेतीमध्ये आहे. आता भारतात याकडे लक्ष दिले जात आहे.  या पद्धतीने शेती करताना पिकांमध्ये हवामान बदलाचा फटका सहन करण्याची ताकद असते. यामध्ये खर्च कमी होतो, पाण्याची बचत होते आणि उत्पादनही वाढते. वास्तविक, शेतीमध्ये रसायनांचा वापर केल्याने केवळ माती कमकुवत होत नाही तर पिकेदेखील विषारी बनतात.**

रासायनिक खते आणि कीटकनाशकेही पर्यावरण प्रदूषित करत आहेत. कीटकनाशके प्रमाणापेक्षा जास्त आढळल्याने अनेक वेळा परदेशी खरेदीदार आमची पिके घेण्यास नकार दिला आहे. ही रसायने भूगर्भातील पाण्यात मिसळून ते प्रदूषित करतात. त्यामुळेच आता नैसर्गिक शेती ही काळाची गरज बनली आहे.  पिकांच्या चांगल्या वाढीसाठी आणि उच्च उत्पादनासाठी आवश्यक असलेली सोळा प्रकारची पोषक द्रव्ये जमिनीत आढळतात. यातील एका घटकाचीही कमतरता असल्यास उर्वरित पंधरा घटकांचा विशेष लाभ पिकाला मिळत नाही.  हे सर्व घटक देशी गायीच्या शेणात असतात.  शेण आणि मूत्राचा वास गांडुळांची संख्या वाढवण्यास मदत करतो आणि हे गांडुळे शेतकऱ्यांचे मित्र मानले जातात. यामध्ये सिंचनादेखील झाडांपासून काही अंतरावर  केले जाते, त्यात केवळ दहा टक्के पाणी वापरले जाते.

नैसर्गिक शेतीमध्ये झाडांची दिशा उत्तर-दक्षिण ठेवली जाते, त्यामुळे झाडांना सूर्याची ऊर्जा आणि प्रकाश जास्त काळ मिळतो. त्यामुळे रोपांचा चांगला विकास होतो, कीड लागण्याची शक्यता तर कमी होतेच, शिवाय पौष्टिक द्रव्येही वनस्पतींमध्ये संतुलित प्रमाणात जमा होतात. नैसर्गिक शेतीमध्ये मुख्य पिकांबरोबरच सहायक पिकेही घेता येतात. या शेती पद्धतीमध्ये देशी बियाणांचाही फार महत्त्वाचा वाटा आहे. देशी बिया  पोषक तत्त्व कमी घेतात आणि जास्त उत्पादन देतात.सुभाष पालेकर यांनी भारतात नैसर्गिक शेती सुरू केली.यापूर्वी त्यांनी आपल्या शेतात रासायनिक पद्धतीचा वापर करून शेती सुरू केली होती.  पण अनेक वर्षांनी त्यांना उपनिषद आणि वेदांमधून नैसर्गिक शेतीची कल्पना सुचली. या धार्मिक ग्रंथांमध्ये प्रचलित असलेल्या काही स्त्रोतांपासून प्रेरित होऊन त्यांनी नैसर्गिक शेती सुरू केली आणि त्यावर शास्त्रीय संशोधन सुरू केले. त्यांनी शेतीच्या अशा पद्धतींचा शोध सुरू केला, ज्यामुळे जमिनीत असलेल्या जीवांचे संरक्षण होऊ शकेल आणि हे तेव्हाच शक्य होते, जेव्हा शेत विषारी रसायनांपासून मुक्त असेल आणि जमिनीचे आरोग्य मजबूत असेल.



रासायनिक शेती करताना पालेकरांना असे आढळून आले की, सुमारे बारा-तेरा वर्षे शेतीतील उत्पन्न वाढतच गेले, पण नंतर मात्र ते कमी होऊ लागले. याशिवाय आदिवासींसोबत काम करताना त्यांना कळले की जंगलातील वनस्पतींच्या वाढीसाठी कोणत्याही बाह्य घटकांची गरज नाही, तर वाढीसाठी लागणारी सर्व संसाधने निसर्गामध्येच उपलब्ध आहेत. सहा वर्षांच्या अथक परिश्रमानंतर रसायनांशिवाय नैसर्गिक शेतीचे तंत्र विकसित करण्यात त्यांना यश आले.  त्याला नाव दिले - 'कमी खर्चाची नैसर्गिक शेती'. आता ते भारतभर त्याचा प्रचार करत आहेत.  विशेषतः लहान आणि अल्पभूधारक शेतकरी याबद्दल खूप उत्सुक आहेत, कारण खते आणि कीटकनाशकांवर कोणताही खर्च येत नाही आणि उत्पन्नही भरपूर आहे. अशा शेतकऱ्यांकडे उत्पन्नाची साधने फारच कमी असतात आणि लागवडीचा मोठा खर्च त्यांचे कंबरडे मोडतो. अनेकांना असे वाटते की नैसर्गिक शेतीमुळे सुरुवातीला उत्पादन कमी मिळेल, पण तसे अजिबात नाही.  पहिल्या वर्षीच शेतकऱ्यांना भरघोस उत्पादन मिळू शकते.

शेतीसाठी खते आणि कीटकनाशके आवश्यक आहेत.  हे घरच्या घरी उपलब्ध पदार्थांपासून बनवता येतात. यामध्ये जीवामृत आणि घनजीवामृत खत म्हणून तयार केले जाते.  या खतामुळे जमिनीची भौतिक स्थिती सुधारते. तसेच शेण, गोमूत्र, वनस्पतींची पाने, तंबाखू, लसूण आणि लाल मिरचीचा वापर कीटकनाशके बनवण्यासाठी केला जातो. शेतीला बऱ्याचदा हवामानाच्या अनियमिततेला सामोरे जावे लागते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते आणि मोठे कष्ट करूनही त्यांची पिके नष्ट होतात. अशा परिस्थितीत नैसर्गिक शेती पद्धतीचा अवलंब करून ही आव्हाने सोडवली जाऊ शकतात. नैसर्गिक शेतीमध्ये पिके हवामान आणि हवामानातील बदल सहज सहन करतात.  रासायनिक शेतीचा खर्च जास्त असतो आणि ज्याप्रकारे रसायने जमिनीच्या सुपीकतेवर आक्रमण करतात, त्यामुळे हा खर्च आणखी वाढतो. अशा परिस्थितीत नैसर्गिक शेती शेतकऱ्यांच्या मनात नव्या आशा जागवत आहे.  वाढता खर्च आणि रसायनांमुळे व्यथित होऊन अनेक शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे.  रासायनिक शेतीपेक्षा कमी खर्चिक आणि चांगला नफा देण्यास सक्षम आहे.

त्याची प्राथमिक गरज पशुपालनाची आहे, कारण खते आणि कीटकनाशके जनावरांच्या अपशिष्टपासून  तयार केली जातात.यामध्ये देशी गाय सर्वात उपयुक्त आहे, कारण देशी गायीच्या शेणात आणि मूत्रामध्ये आढळणारे घटक इतर कोणत्याही प्राण्यांच्या अपशिष्टमध्ये आढळत नाहीत. पूर्वी आपल्या देशात अशा प्रकारे शेती केली जात होती आणि त्यापासून तयार होणारे अन्नधान्य, फळे, भाजीपाला इत्यादींची वैशिष्ट्ये वेगळी होती. आज पुन्हा त्याच तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची गरज आहे, जेणेकरून आरोग्य, पर्यावरण आणि माती नापीक बनण्याचा धोका थांबून आपली प्राचीन समृद्धी साधता येईल. वास्तविक, मातीत आढळणारे प्राणीमित्रच शेतीला खूप मदत करतात. रसायनांच्या वापरामुळे ते मरायला लागतात, त्यामुळे हळूहळू पृथ्वीची सुपीक शक्ती कमी होऊ लागते आणि ती नापीक होण्याच्या मार्गावर पोहोचते. नैसर्गिक शेतीत वापरले जाणारे खत आणि सेंद्रिय पदार्थ जमिनीत आढळणाऱ्या या प्राणीमित्रांची संख्या अनेक पटींनी वाढवतात, त्यामुळे पृथ्वीची सुपीकता, पिकांची गुणवत्ता आणि प्रमाणही वाढते. त्यासाठी फारसे खत किंवा पाणी लागत नाही.  अशा रीतीने ही शेती शेतकरी, पृथ्वी आणि पर्यावरणासाठी सर्व प्रकारे उपयुक्त आहे.  पण ज्या पद्धतीने शेती हा उद्योग बनण्यासाठी स्पर्धा वाढीला लागली आहे, त्यात यंत्रांचा आणि रासायनिक खतांचा अतार्किक वापर दिसून येतो. बऱ्याच परदेशी कंपन्या जास्त उत्पादन देणाऱ्या बियाण्यांच्या विकासात, संशोधनात गुंतलेल्या आहेत. देशातील हवामान आणि मातीचे स्वरूप लक्षात घेऊन बियाणे विकसित करणारी कृषी संशोधन केंद्रे आता डबघाईला आली आहेत. अशा परिस्थितीत सरकारने केवळ नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन न देता बियाणे, खते, रसायने बनवणाऱ्या कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.

# गाथा 'अग्निदिव्य'ची...



आशिष निनगुरकर
संपर्क क्र. ९०२२८७९९०४


आधुनिक केसरी

**एका मुलाची आंतरिक वेदना,एका महिलेचा आभाळाएवढा संघर्ष व समाजमन असे तीन टप्पे यात आहेत. एका महिलेने व तिच्या मुलाने केलेला संघर्ष म्हणजे हे पुस्तक. एका स्त्रीचा लढा मर्यादित न राहता 'अग्नितांडव' मधून तो 'अग्निदिव्य' बनत गेला. म्हणूनच हा जीवनप्रवास  केवळ त्या महिलेपुरता मर्यादित न राहता त्याला अनेक छटा आहेत. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात हे पुस्तक रसिकवाचकांच्या भेटीला येत आहे. त्यामुळे हे पुस्तक वाचायला नक्की आवडेल व त्यातून प्रेरणा मिळेल.  दोन वर्षांपूर्वी माझ्या आयुष्यात एक मित्र आला. मुंबईच्या साकिनाका डाक कार्यालयात काम करतांना भेटलेला हा मित्र अभिषेक कांबळे.त्याचा जीवनप्रवास ऐकल्यावर मला राहवले नाही.**

त्याच्या मनात त्याच्या भूतकाळाविषयी अनेक प्रश्न होते, त्या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा आटोकाट प्रयत्न मी चालू केला. मित्रत्व स्वीकारलं की सगळ्या गोष्टी कराव्या लागतात. सुख-दुःख वाटून घ्यावे लागतात. माझी ती प्रोसेस सुरू झाली. तेव्हाच या विषयावर लिहावे, हे मनाशी पक्के केले होते. मी हे माझ्या मित्राला देखील बोलून दाखवले. पण तो त्याच्या भूतकाळात पूर्णपणे अडकला होता. कदाचित त्याला मन मोकळे करायचे होते आणि त्याला मन मोकळं करण्याला हक्काची जागा म्हणजे मी त्याला त्यावेळी भेटलो.

नुकतीच काही महिन्यांपूर्वी अभिषेक याची बदली पुण्याला झाली. मी, माझी पत्नी किरण व मुलगा देवांश पुण्याला गेलो असताना त्यांच्याकडे थांबलो. त्यावेळी काही कामानिमित्त माझी 'चपराक' प्रकाशनाचे संपादक व प्रकाशक घनश्याम पाटील यांची भेट ठरलेली होती.मग मी कुटूंबासोबत आल्याचे त्यांना कळल्यावर, त्यांनी कुटूंबासोबत घरी येण्याचा आग्रह केला. मग मी ,माझी पत्नी किरण, मुलगा देवांश व अभिषेक आणि अभिषेकची आई रमाबाई असे पाटील सर यांच्या घरी गेलो. तो दिवस मी कधीच विसरणार नाही. रंगपंचमीचा दिवस होता. गप्पाटप्पा सुरू होत्या. चहा-नाश्ता अप्रतिम मेजवानी होती. त्यातच पाटील सरांनी विचारले, 'आशिष भाऊ नवीन काय लिहिताय?' मी सहज बोलून गेलो,'अभिषेक व त्यांच्या आईबद्दल लिहितोय.' त्यावर पाटील सरांनी उत्सुकतेने विचारले,'काय ?' मी विषय ऐकवला. त्यांना प्रचंड भावला. मग त्यांनी काही प्रश्न विचारले, अभिषेकची आई समोरच असल्याने तात्काळ प्रश्नांची उत्तरे मिळाली. घनश्याम सरांनी ताबडतोक हे पुस्तक मला लिहून हवे आहे  आणि हे पुस्तक आपल्या 'चपराक प्रकाशन'द्वारे  प्रकाशित होईल,असे जाहीर करून टाकले. तेव्हा या पुस्तकाची अगदी मोजकी पाने लिहून तयार होती.पाटील सरांचे आई-वडील देखील त्यावेळी उपस्थित होते. त्यांच्या आशीर्वादाने या पुस्तकाचे काम सुरु झाले. माझे लेखन काम संथगतीने सुरू होते.परंतु पाटील सरांच्या या आदेशाने माझी धावपळ वाढली.कदाचित या पुस्तकाचे नशीब चांगले, म्हणून 'चपराक' सारखी' उत्तम प्रकाशन संस्था या पुस्तकाला भेटली. रंगपंमचीच्या दिवशी आमची पुण्यात झालेली घनश्याम सर व कुटूंबियांची भेट यादगार ठरली.

माझे मन देखील भूतकाळात गेले.काही वर्षांपूर्वी 'चपराक' च्या दिवाळी अंकात कविता छापून येण्यासाठी झगडणारा मी आता या प्रकाशनसंस्थेद्वारे प्रकाशित होणाऱ्या माझ्या दोन पुस्तकांच्या लेखनात व्यस्त होतो.एक कथासंग्रह 'लालबत्ती ते कारंबा' आणि दुसरे हे चरित्रात्मक पुस्तक. मी अभिषेक व त्यांच्या आईसोबत विविध घटनांवर




चर्चा करत या पुस्तकावर काम सुरू केले. एका महिलेचा संघर्ष,माहेर-सासर जबाबदारी,त्यातून वाढलेल्या अनेक गोष्टी या सर्व परिस्थितीतून एका स्त्रीला कशाप्रकारे सर्व गोष्टींमधून जावे लागते. सासर व माहेरची दोन्ही नाती कशी सांभाळावी लागतात. हे सर्व समजून घेण्याचा प्रयत्न करू लागलो. अभिषेक व त्यांच्या आईचा जीवनपट किती काळीज फाडून दुःख देणारा आहे,हे पुस्तक वाचल्यावरच तुम्हाला कळू शकेल. पण खरं सांगू तर अशी वेळ कुणावर येऊ नये असे वाटते. एक स्त्री आपल्यावर आलेल्या सर्व संकटावर कशी  मात करते.वेळप्रसंगी पळ न काढता प्रत्येक गोष्टीला कशी सामोरी जाते. तोंड देते,कुणाच्या खोट्या आश्वासनांना बळी पडत नाही. एका स्त्रीचा स्वतःच्या आस्तित्वासाठी व स्वतःच्या मुलाला हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी दिलेला हा लढा, एक संघर्ष म्हणजेच हे पुस्तक. जेव्हापासून मी हे पुस्तक लिहायला घेतले, तेव्हापासून मी माझ्या डोक्यात एका महिलेने आणि तिच्या मुलाने केलेला हा संघर्ष म्हणजे 'अग्नितांडव'हेच नाव या पुस्तकाचे शीर्षक म्हणून मला योग्य वाटत होते. पण पुस्तकाचे लेखन पूर्ण झाल्यावर हा एका स्त्रीचा लढा केवळ 'अग्नितांडव' न राहता तो 'अग्निदिव्य' बनत गेला. मग पुस्तकाच्या अंतिम टप्प्यात या पुस्तकाला समर्पक असे 'अग्निदिव्य' हे शीर्षक फायनल झाले. कारण या नावातच या पुस्तकाचा सर्व गाभा दडलेला आहे.एका मुलाची आंतरिक वेदना, एका स्त्रीचा आभाळाएवढा संघर्ष व समाजमन असे तीन टप्पे यात आहेत. या पुस्तकातून तुम्हाला एक मुलगा व त्याच्या आईचा जीवनपट वाचताना खूप काही गोष्टी मिळतील. प्रेरणा मिळेल. किती वेदना झाल्या तरी सकारात्मक राहून कसे काम करायचे हा अनमोल असा संदेश मिळेल.

प्रत्येकाच्या जीवनात अनेक चढउतार येत असतात. आयुष्य हे असेच चित्रविचित्र गुंतागुंतीचे बनलेले आहे. कुठलाही रस्ता सरळ नसतो आणि सहजसोप्या पद्धतीने काहीच मिळत नसते आणि सहजसोपे काही मिळाले तरी त्याची किंमत नसते. कोणतेही मोठे दुःख झाले तरी आत्महत्या करणे हा शेवट असता  कामा नये.सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात, फक्त आपण ती शोधायला हवीत. हे पुस्तक वाचून तुम्हाला सकारात्मक ऊर्जा मिळेल आणि ती आजच्या धावपळीच्या व धकाधकीच्या जगात जगायला बळ देईल. नात्यांची वस्तुस्थिती कळेल. या पुस्तकासाठी मला अभिषेक व त्यांच्या आई रमाबाई यांनी खूप सहकार्य केले. मी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नांची उत्तरे त्यांनी मनमोकळेपणाने  दिली. म्हणूनच हा लेखनप्रपंच पुस्तकरूपाने आपल्या भेटीला आणणे शक्य झाले. 'चपराक प्रकाशन'चे संपादक घनश्याम पाटील यांचे जेवढे आभार मानावेत तेवढे कमीच आहेत.

त्यांच्या कल्पक,अभ्यासू, वैचारिक व रसिक वृत्तीला मनापासून सलाम.एका संकटग्रस्त कुटुंबातील स्त्रीला संशयकल्लोळातून कोणत्या अग्निदिव्यातून जावं लागलं, हे सांगणारी ही वास्तव कथा. लागोपाठच्या संकटांनी तिच्या आयुष्याची परवड झाली. त्यातही ती खंबीरपणे उभी राहिली. संकटांशी दोन हात केले. आपल्या मुलासाठी संघर्ष केला. अनंत अडचणींवर मात केली. मुलाला अर्थार्जनासाठी सक्षम केलं. त्याच्या पायावर उभं केलं. एका आईचं कर्तव्य पार पाडलं. कुठलाही दोष नसताना, गैरसमजाच्या अग्निदिव्यातून जात तिनं एक महत्त्वाचा टप्पा गाठला. यात आपलं अस्तित्व, ओळख मात्र ती पार विसरून गेली. अजूनही तिची वाटचाल संपलेली नाही. अजूनही तिची वाटचाल सुरूच आहे.  तिच्या कष्ट-त्याग-समर्पणाचीच ही एक गाथा-गाथा अग्निदिव्याची...येत्या सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात 'चपराक प्रकाशन' द्वारे 'अग्निदिव्य' पुस्तक रसिकवाचकांच्या भेटीला येत आहे.

# अण्णा भाऊ पूर्वार्धात मार्क्सवादी तर उत्तरायुष्यात आंबेडकरवादी

## प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर : लोकप्रबोधन आणि संविधान सांस्कृतिक जलसा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** साहित्यरत्न कॉ. अण्णा भाऊ साठेंच्या जीवनाचा पूर्वार्ध हा मार्क्सवादी तर उत्तरार्ध आंबेडकरवादी राहिलेला आहे. त्यामुळे ते एकाचवेळी मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी ठरतात. शिवाय हे दोन्ही तत्वज्ञाने ही सर्वंकष समतामूलक आहेत म्हणून त्यात भेद करणं तितकं योग्य नाही. हे दोन्ही विचारप्रवाह परस्परपूरक असेच आहेत. असे प्रतिपादन प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले. ते मातंग समाज परिवर्तन परिषदेच्या साहित्यसम्राट कॉ. अण्णाभाऊ साठे व महाकवी वामनदादा कर्डक यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित लोकप्रबोधन आणि संविधान सांस्कृतिक जलसा कार्यक्रमात बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की अण्णाभाऊंना नीट समजून घ्यायचे असेल तर आधी अण्णाभाऊंनी केलेल्या चळवळी अन् विभिन्न आंदोलने समजून घ्यावे लागतील. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, मराठवाडा मुक्तिसंग्राम आणि गोवा मुक्ती आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला संविधान सांस्कृतिक जलशाचा कलावंत संचाने _'अण्णाभाऊ मोठे भाऊ' 'सखा रे अण्णाभाऊ आमचा सखा रे'_ ही आणि याच प्रकारची अण्णाभाऊ व वामनदादांची क्रांतीगीते सादर करून श्रोत्यांची दाद मिळविली.
कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. संजय मोहड यांनी वामनदादा कर्डक यांच्या सांगीतिक वाटचालीचा आढावा घेत त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. फुले-शाहू-आंबेडकरी, डाव्या, लोकशाहीवादी चळवळींचे समन्वयक डॉ. संग्राम मौर्य, गुरू रविदास सत्यशोधक समाजाचे जिल्हा संयोजक सी. एम. रमणे, ॲड. दयानंद भांगे, भीमगीत गायिका कडुबाई खरात यांचीही समयोचित भाषणे झाली. मंचावर मधुकरदादा चांदणे सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष कमलेश भाऊ चांदणे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मातंग समाज परिवर्तन परिषदेचे संस्थापक अध्यक्ष



कबीरानंद यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रस्तुत कार्यक्रमात मातंग समाज परिवर्तन परिषदेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने महाकवी वामनदादा कर्डक यांना 'मानद डी. लिट.' देऊन सन्मानित करावे अशी मागणी करण्यात आली. प्रस्तुत कार्यक्रमास मातंग, चर्मकार, बौद्ध यांसह विविध समाजाच्या लोकांची भरपूर उपस्थिती होती. सामाजिक, राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर यावेळी सभागृहात उपस्थित होते. त्यात भाकपचे जिल्हा शहर सचिव कॉ. अभय टाकसाळ, वंचित बहुजन महिला आघाडी जिल्हाध्यक्ष ॲड. लताताई बामणे, मातंग एकता आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष पत्रकार संदीप मानकर, पेन्शनर्स असोसिएशनचे विलास जाधव,मुख्याध्यापक महासंघाचे अध्यक्ष प्रभाकर अर्सुड, लहुजी साळवे पतसंस्थेतचे साईनाथ भालेराव, बामसेफचे जिल्हाध्यक्ष समाधान सुरडकर, भारतीय क्रांती दलाचे अध्यक्ष शैलेंद्र मिसाळ, गुरू रविदास सत्यशोधक समाजाचे महासचिव ग. मा. पिंजरकर होते. याप्रसंगी मच्छिंद्र चंदनशिव, डॉ. संजय पिटाले, सचिन मिसाळ, संजयकुमार बोडके, पंजाबराव गायकवाड, सोमनाथ शेजवळ, संदीप कारके, बळीराम किनाळकर, अर्जुन रसाळ, अरूण वाघमारे, देंडे गुरूजी, एस. आर. गायकवाड, राम कांबळे यांसह इतर अनेकांची उपस्थिती होती.
कार्यक्रमासाठी विजय कांबळे, इंजिनिअर दिगंबर मन्यार, विलास भालेराव, कैलास भालेराव, दीपक बाजड, संजय कसारे, पंकज पवार, बिभीषण शिंदे, अरूण वाघमारे, डॉ. संजय पिटाले, विठ्ठल आव्हाड, संदीप कारके, राजू तुपे, विनोद कसारे, समीक्षा बामणे, अभिजीत बांगर, सोनू गायकवाड, अशोक बनकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महासचिव ईश्वर दनके यांनी तर आभार रेव्ह. कल्याण कारके यांनी मानले.



# आदिवासींना जीवनावश्यक साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सामाजिक कार्याची आवड आणि निवड ही माणसाच्या अंगीकृत स्वभावातून निर्माण होते.आणि हे कार्य करण्याकरिता कुठलीही वेळ - काळ पहिली जात नाही तर मनातील प्रबळ इच्छाशक्तीच या अश्या क्षणांना निर्माण करते ! आणि अश्याच प्रेरणादायी क्षणांनी आज एक सामाजिक कार्य सजलं ते केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था व श्री समर्थकृपा सखी स्वयंसहाय्यता सा.संस्था या सामाजिक संस्थांच्या माध्यमातून आणि राजू मुंबईकर आणि संगिताताई ढेरे मॅडम यांच्या औदार्यातून पेण तालुक्यातील निफाडवाडी,पनवेल तालुक्यातील तारा येथील कोरलवाडी आपटा येथील रामाचीवाडी या आदिवासी वाड्यांवर डाबर या नामांकित कंपनीच्या वेदिक चहापावडरची पाकीटं रिअल फ्रेश फ्रूट ज्यूसच्या रिअल मँगो बॉटल्स( एक लिटर ), लीची मिक्स फ्रूट ज्यूस पाकीटं( एक लिटर) , नारळ पाण्याच्या बॉटल्स,किराणा सामान,चटई, महिला भगिनी करिता साड्या आणि युवती करिता टॉप्सचं आणि सँनिटरीपॅडचं वाटप करण्यात आले. आले.सोबतच राजू मुंबईकर यांच्या मनाच्या मोठेपणातून व औदार्यातून एक संकल्परुपी कार्य साकारलं गेलं ते म्हणजे कोरलवाडी या आदिवासीं वाडीवरील एक गरीब निराधार आजी- आजोबांना ज्यांच्या पाठीमागे त्यांच्या कुटुंबात आत्ता कुणीही उरलं नाही. त्या आजी - आजोबांना किराणा सामान, चटई देण्यात आल्या आणि त्यांचं जो पर्यंत आयुष्य आहे तो पर्यंत त्यांना लागणारा जीवनावश्यक किराणा सामान हे राजू मुंबईकर यांच्या कुटुंबाकडून आयुष्यभर पुरविल जाईल असं आश्वासन दिलं. या कार्यक्रमात आदिवासीं बांधवांच्या वतीनं सर्वांचं स्वागत केलं ते निफाडवाडीचे माजी सरपंच मारुती कुऱ्हाडे आणि कोरलवाडी आदिवासीं वरील सामाजिक कार्यकर्ते दामूदादा वाघमारे यांनी केले.

# वैजापूर स्टेशनमध्ये शांतता समिती बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** आगामी महिन्यात येणारे उत्सव गोकुळाष्टमी, पोळा,श्री गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद व ईतर उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंगळवार (ता.२९)रोजी पोलीस स्टेशन मध्ये शांतता समिती सदस्य,जेष्ठ नागरिक व समाज कार्यकर्ते यांची बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी तथा सह,पोलीस अधीक्षक महक स्वामी यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली ,या बैठकीत येणारे उत्सव शांततेत व बंधुभाव व समाजीकतेने संपन्न करावे असे आवाहन करण्यात आले. गणेश उत्सव दरम्यान विविध स्पर्धा घेणे, शांतता, सुव्यवस्था राखणे, समाजप्रबोधन कार्यक्रम घेणे यासाठी ।पोलिसांच्या वतीने बक्षीस दिली जाणार आहेत. शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

प्रास्ताविक पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कौठाळे यांनी केले आभार धोंडीरामसिंह राजपूत यांनी मानले. या प्रसंगी प्रकाश शेठ बोथरा, प्रशांत शिंदे, प्रशांत त्रिभुवन हिकमतउला सय्यद,भीमाशंकर साखरे, अल्ताफ बाबा, काझी हाफिजोद्दीन,काझी मलिक, ॲड. नुसरत बेगम, विशाल त्रिभुवन, शैलेश खैरमोडे, अशोक बागुल अकिल कुरेशी, शेख रियाजोद्दीन, वाळुंज, निलेश पारख, कलीम कुरेशी, एराज शेख व ईतर सदस्य उपस्थित होते.





# तब्बल 31 वर्षांनंतर सरस्वती भुवनचे वर्गमित्र आले एकत्र

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील श्री सरस्वती भुवन 1992 च्या दहावी वर्गाच्या बॅचचे वर्ग मित्रांचे स्नेहसंमेलन पार पडले.

फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील सरस्वती भुवन प्रशालेत च्या दहावी वर्गाच्या वर्ग मित्राचे स्नेहसंमेलन म्हैसमाळ येथे संपन्न झाले. यावेळी 31 वर्षाच्या नंतर वर्गातील मित्र या ठिकाणी जमले होते यात काही डॉक्टर झाले. काही शिक्षक झाले ते काही ग्रामसेवक तर काही चांगले व्यावसायिक तर काही चांगले शेतकरी आहेत वडोद बाजार येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेतील दहावी वर्गाच्या 1992 च्या वर्ग मित्रांचे स्नेहसंमेलन पार पडले.

म्हैसमाळ येथील बालाजी मंदिर या ठिकाणी ठिकाणी असलेल्या निसर्गरम्य वातावरणाचा वर्ग मित्रांनी आनंद घेतला यावेळी डॉक्टर अनिल वाघ, मधुकर मस्के, रवींद्र पाठक, सोमीनाथ खाकरे, साहेबराव ठाकरे, संदीप कोलते, भाऊसाहेब, राजू काटकर, बाबासाहेब शिंदे, काकाजी तुपे, आप्पासाहेब कापरे, शिक्षक शांताराम तोरणमाळ , ग्रामसेवक रानोबा काथार, गुलाब भाळकर, शिवाजी खरात, सोमनाथ सोनवणे, राजधर कोलते, भारत काकडे, संजय कोलते, शैलेश पाटणे, देवा राठोड, जिजा डेरे, संगीता घणघाव, संगीता वाघ ,मंगलाबाई कापरे, शारदा भारती, मीरा काकडे, शेषराव ब्राह्मणे, शंकर गिरी संतोष सोमदे, राजू शिंदे गणेश शिंदे गंगाधर डेरे, गंगाधर ब्रहामने, गणेश दांगोडे, संजय वाघ यावेळी उपस्थित होते.

# सिडको कार्यालयावर बोकडवीरा ग्रामस्थांनी धडक दिली

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सिडकोच्या द्रोणागिरी नोड कार्यालयावर विविध मागन्यांच्या पूर्ततेसाठी सोमवारी बोकडवीरा ग्रामस्थांनी धडक दिली. उरण पनवेल मार्गावरील हाईट गेट हटवावे व गेटमुळे अपघात झालेल्यांना नुकसानभरपाई द्यावी, या प्रमुख मागण्यांसाठी मोर्चा काढण्यात आला होता. या मागण्यांवर सिडको, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाहतूक विभाग यांच्यात पाच तास सकारात्मक चर्चा होऊन मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. उरण पनवेल मार्गावरील फुंडे हायस्कुल जवळ येथील हाईट गेटला धडकल्याने टेम्पोचा अपघात झाला आहे. या अपघाताच्यावेळी टेम्पो मागे असलेल्या दुचाकीवरील बोकडवीरा गावातील अंकुश पाटील व त्यांची सात वर्षाची मुलगी मनविता यांचाही अपघात झाला. या अपघातात बापलेक दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार करण्यासाठी सिडकोने आर्थिक मदत करावी तसेच अपघातांना जबाबदार असलेले हाईट गेट मोकळे करावेत या दोन प्रमुख मागण्यांसाठी बोकडवीरा ग्रामस्थांनी सिडकोकडे मोर्चा काढला होता. हाईट गेटमुळे या मार्गावर झालेला आता पर्यंतचा १९ वा अपघात आहे. हाईट गेटच्या टेम्पो अपघातात कोट गावातील एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यामुळे वाढत्या अपघातामुळे या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवासी व नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.



# विद्येच्या माहेघरातून मृणाल गांजाळे दिल्लीच्या दिशेने

## ५ सप्टेंबरला राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने होणार सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** पुण्याच्या बाबत "पुणे तिथे काय उणे"अशी एक म्हण आजही प्रचलित आहे.विद्येचे माहेरघर म्हणूनही ह्याच पुण्याला एक वेगळी ओळख आहे.आज त्याच पुण्यातून,विद्येच्या माहेरघरातून मृणाल गांजाळे नावाच्या उपक्रमशील शिक्षिका थेट दिल्लीच्या दिशेने आगेकूच करणार आहेत. याचे कारण म्हणजे त्यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे.केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून मृणाल नंदकिशोर गांजाळे यांच्या नावाची घोषणा करण्यात आलेली असून दिनांक ५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय शिक्षक दिनी हा पुरस्कार त्यांना दिल्लीत बहाल करण्यात येणार आहे.या पुरस्काराबद्दल शैक्षणिक क्षेत्रासह विविध क्षेत्रातील लोकांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे. हा पुरस्कार देशातील एकूण ५० शिक्षकांना देण्यात येणार आहे. यामध्ये मृणाल गांजाळे ह्या महाराष्ट्र राज्यातील एकमेव शिक्षिका असल्याने पुण्यासह राज्यातून त्यांचे विशेष कौतुक केले जात आहे.राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या सह राज्याचे शिक्षण आयुक्त सूरज मांढरे,सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील,खासदार अमोल कोल्हे, पुणे जिल्हा परिषद सीईओ रमेश चव्हाण, शिक्षण अधिकारी माध्यमिक प्राथमिक सुनंदा वाखारे, संध्या गायकवाड आदींनी शिक्षिका मृणाल गांजाळे यांचे अभिनंदन केलेले आहे.तुमच्या सारख्या शिक्षिकांमुळे विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण होत आहे.असे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी म्हटले असून पुढील सक्षम पिढी घडविण्याच्या कार्यास शुभेच्छा दिलेल्या आहेत. पिंपळगाव महाळुंगे (ता.आंबेगांव जि.पुणे) येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेत त्या शिक्षिका म्हणून विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे काम करत आहेत.त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आलेली आहे. त्या गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न करत असतात.अध्ययन अध्यापनात माहीती तंत्रज्ञानाचा वापर करणे, ज्ञानप्राप्तीसाठी व्हर्च्युअल जगभ्रमंती,३८ देशांमधील शिक्षकांशी आणि विद्यार्थ्यांशी संवाद व शिक्षणाचे आदान प्रदान करणारी प्रक्रिया,बोलक्या बाहुल्यांचा वापर करणे यांमुळे मृणाल गांजाळे यांची शिक्षण पद्धत विद्यार्थ्यांच्या दृष्टीने कृतीशील पणे आणि ज्ञानमय व आनंददायी अध्यय करणारी ठरत आहे.शिक्षण प्रकिया मजेशीर आणि परस्परसंवादी होण्याच्या दृष्टीकोनातून त्या ऑगमेंटेड रिऍलिटी (ए आर) व आभासी वास्तविकतेचा (व्ही आर) आदींचा परिणामकारक वापर करत असतात. त्या शिक्षण क्षेत्रात एक आदर्श वादी कार्य करत आहेत. मृणाल गांजाळे यांच्या निवडी ने शिक्षक शिक्षिकांना नवं प्रेरणा मिळेल.येणाऱ्या काळात जिल्हा परिषद शाळेला एक नवी झळाळी आणेल. मराठी शाळा टिकली पाहिजे.ही भावना समाजातील प्रत्येक माणसाची असल्याने मृणाल गांजाळे यांच्या सारख्या मेहनती,कर्तृत्ववान व प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शिक्षिका जिल्हा परिषद शाळेत असल्याने मराठी शाळांना अशा उपक्रमशील शिक्षिकेची नितांत गरज आहे.मृणाल गांजाळे यांना मिळालेला हा पुरस्कार शाळेतील विद्यार्थ्यांचाच नव्हे तर पालकांचा अन जिल्हा परिषद शाळेचा, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक शिक्षकवृंद यांचा विश्वास बनलेला आहे.मृणाल गांजाळे यांच्या ह्या शैक्षणिक कार्याने शैक्षणिक क्षेत्राची अधिक उंची वाढलेली आहे. त्यामुळे मृणाल गांजाळे यांच्या कडून उपक्रमशील शिक्षणातून विद्यार्थ्यांना मिळत असलेले ज्ञान हे महत्वपूर्ण असून देश पातळीवर दखल घेतल्याने याचा सार्थ अभिमान विद्येचे माहेरघर समजलेल्या पुण्याला नक्कीच असणार आहे.



**हा पुरस्कार माझ्या सर्व विद्यार्थ्यांना समर्पित** : जेव्हा शिकण्यात आनंद जोडला जातो .तेव्हा शिक्षण खऱ्या अर्थाने दर्जेदार होते .अध्ययन अध्यापन प्रक्रियेला अधिकाधिक विद्यार्थीकेंद्रित आणि आनंददायी बनविण्यावर माझा भर आहे .शिक्षणाचा विद्यार्थ्यांना भविष्यात वापर करता यावा,पाठ्यपुस्तकाच्या पलीकडे शिक्षण मिळावं,त्यांच्यात २१ व्या शतकातील कौशल्ये विकसित व्हावीत यासाठी जीवनाभिमुख शिक्षण देण्याचं माझं उद्दिष्ट आहे .ते साधण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा अभिनव वापर करत आहोत .याचंच फलित म्हणजे हा पुरस्कार .यामुळे आम्हाला आणखी काम करण्याची प्रेरणा मिळेल .हा पुरस्कार माझ्या सर्व विद्यार्थ्यांना समर्पित करत असल्याचे राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त मृणाल गांजाळे यांनी म्हटले आहे .



# कन्नडच्या गणेश महासंघाची अध्यक्षपदी डॉ. सदाशिव पाटील यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहर गणेश महासंघाची यंदाची कार्यकारिणी गणेश महासंघाचे संस्थापक अध्यक्ष पवन सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि.१२) ऑगस्ट रोजी निवडण्यात आली. त्यामध्ये शहरातील माजी उपनगराध्यक्ष तथा शिवसेना उद्धव गट शहर प्रमुख डॉ.सदाशिव पाटील यांची सर्वानुमते कन्नड गणेश महासंघाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

तसेच महासंघाच्या उर्वरीत कार्यकारिणीत उपाध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ कणगरे, सोमनाथ दाभाडे, उदय सोनवणे, सचिव संजय शिंदे, कार्याध्यक्ष प्रल्हाद तायडे, कोषाध्यक्ष पवन ठाकूर यांच्यासह आदींचा समावेश आहे. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष पवन सोनवणे, माजी नगराध्यक्ष विलास वाडेकर, माजी सभापती धनराज बेडवाल, मनोज देशमुख, संदेश पवार, राजेंद्र गव्हाणे, श्याम महाले, सुरेश डोळस, याकूब भाई शेख, मनोज देशमुख, सुनील अण्णा निकम, पवन ठाकूर, अनिल खंबाट, विजय शिंदे, छोटू परदेशी, संजय पाटील, संदीप नरवडे, भगवान परदेशी यांच्यासह मोठ्या संख्येने गणेश भक्त उपस्थित होते.

शहरातील गणेश महासंघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष तथा शिवसेनेचे शहर प्रमुख डॉ .सदाशिव पाटील बोलताना म्हणाले की, यावर्षी कन्नड शहरात सामाजिक उपक्रम राबवत मोठ्या उत्साहात गणेश उत्सव साजरा केला जाणार आहे . शहरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम घेण्यात येणार आहे . तसेच विविध परिसरात स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी शिबीर व मोफत औषधांचे वाटप, शहरातील महापूरुषांच्या पुतळ्यास अभिवादन असे विविध उपक्रम कन्नड गणेश महासंघाच्या वतीने दहा दिवस नाही तर वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती डॉ .सदाशिव पाटील यांनी यावेळी दिली .

# बिडकीन महावितरणचे 33 केव्ही विद्युत उपकेंद्र महाराष्ट्रात चमकले

आधुनिक केसरी न्यूज

**रविंद्र गायकवाड**

**बिडकिन :** दि.२८ रोजी पैठण तालुक्यातील बिडकिन उपकेंद्र यास आय एस ओ मानांकन प्राप्त झाल्याबद्दल सन्मान सोहळा व उपकेंद्र पाहणी करण्याचे आयोजन करण्यात आले होते. इज ऑफ लिव्हिंग' अर्थात जगण्याचा दर्जा वाढवण्यासाठी वीज हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा करण्यासह सर्वोत्कृष्ट सेवा देण्याचा ध्यास महावितरणच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घ्यायला हवा, असे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांनी केले.तसेच शहरासह ग्रामीण च्या ही उपकेंद्रे आय एस ओ मानांकन प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मानस ही यावेळी घेण्यात आला आहे. बिडकीन येथील महावितरणच्या 33 केव्ही विद्युत उपकेंद्राला राज्यात दुसरे तथा मराठवाड्यातील पहिले आयएसओ 9001: 2015 मानांकन मिळाले यानिमित्ताने बिडकिन उपकेंद्र येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. त्यानिमित्त सोमवारी (28 ऑगस्ट) आयोजित समारंभात मुख्य अभियंता डॉ.केळे बोलत होते. यावेळी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, कार्यकारी अभियंता संदीप देशपांडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता विश्वनाथ लहाने, दीपक माने, बिडकीनचे सहायक पोलिस निरीक्षक गणेश सुरवसे उपस्थित होते. आयएसओसाठी परिश्रम घेतल्याबद्दल सहायक अभियंता अविनाश चव्हाण व त्यांच्या सहकारी यंत्रचालकांचा मुख्य अभियंता डॉ.केळे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.केळे म्हणाले की, परिमंडलातील उर्वरित उपकेंद्रे व महत्त्वाच्या आस्थापनांनीही बिडकीन उपकेंद्राचा आदर्श घेत आयएसओ मानांकन मिळवण्यासाठी प्रयत्न करायला हवे आणि वीजग्राहकांना दर्जेदार व तत्पर सेवा दिली पाहिजे. यावेळी आयएसओ मानांकनाचे प्रतिनिधी नंदकुमार देशमुख म्हणाले की, आम्ही सुचवलेल्या सर्व 59 सुधारणा बिडकीन उपकेंद्राने केल्या. सुरक्षित व अखंडित वीजपुरवठ्यासह सर्व निकषांची काटेकोर अंमलबजावणी केली. सहायक अभियंता चव्हाण यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शन व सहकार्यामुळेच हे मानांकन मिळाल्याची भावना व्यक्त केली. सहायक अभियंता अविनाश चव्हाण यांचा उपस्थिती मान्यवरांच्या हस्ते नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले बद्दल सत्कार करण्यात आला.



# बुलढाणा येथे इंडियन डेंटल असोसिएशनच्या वतीने कार्यशाळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज




**बुलढाणा :** येथे इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा तर्फे निरंतर दंत वैद्यकीय शिक्षण कार्यक्रमांतर्गत फेशियल इस्तेटिक या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि धन्वंतरी पूजनाने करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर शरद जुमडे होते या कार्यक्रमाला नाशिक येथील नामवंत डॉक्टर पुनम पाठक यांनी सखोल मार्गदर्शन केले.

प्रत्येक स्त्री आणि पुरुषाला आपण सुंदर दिसावं आपली त्वचा तजेलदार दिसावी असं वाटतं वाढत्या वयानुसार चेहऱ्यावर सुरकुत्या पडायला लागतात मात्र बोटॉक्स आणि फिलर्स या ट्रीटमेंटचा वापर करून त्वचेची निगा राखणे शक्य आहे. बोटॉक्स हे न्यूरो टॉक्सिन आहे. याचे इंजेक्शन स्नायूमध्ये देऊन तो स्नायूंचा भाग काही काळासाठी शिथिल करण्यात येतो त्याचाच परिणाम म्हणून त्वचा जास्त ताजी नितळ व तजेलदार सुरकुत्या विहीन दिसते बोटू लीनम टॉक्सिन मज्जातंतूर अंमल करते याचे इंजेक्शन स्नायू दिले जातात आठवडाभरात चेहरा तरुण दिसायला लागतो ओट आणि गालाचा आकार बदलायचा असेल तर त्यासाठीही बोटक्स आणि फिलर्स खूप प्रभावी आहे. बोटॉक्स आणि फिलर ट्रीटमेंट विषयी तुम्ही तुमच्या दंतवेद्याला विचारू शकता दातांच्या दवाखान्यांमध्ये हे उपचार घेणे शक्य आहे दंत वैद्य तुमच्या दातासोबत तुमच्या त्वचेची ही काळजी घेतील. रुग्णांच्या बदलत्या अपेक्षा लक्षात घेऊन बोटॉक्स आणि फिलर्स या पद्धतीचा समावेश दंतविद्यांनी आपल्या व्यवसायात करण्याचे आव्हान डॉक्टर पूनम पाठक यांनी केले. सूत्रसंचालन डॉक्टर वृषाली गवळी आणि डॉक्टर नीता जतकर यांनी केले सेक्रेटरी डॉक्टर सचिन किनगे यांनी आभार प्रदर्शन केले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद




# भोकरला सरवाई पापन्ना यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** सरवाई पापन्ना यांनी जमीनदारी व्यवस्थेविरुद्ध केलेल्या संघर्षाचे आणि बलिदानाचे स्मरण करून पापन्ना याची ३७३ वी जयंती फटाक्याच्या अतिष बाजी व ढोल ताशाच्या गजरात उत्साहात साजरी करण्यात आली.
लोकप्रतिनिधी इतर वर्गातील जनतेनी सरवाई पापन्ना यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. कलाल गौड संघाने लहुजी साळवे चौक मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते किनवट रोड पर्यंत दूचाकी मिरवणुक काढली. माजी नगरअध्यक्षा संगीता विनोद पाटील चिचांळकर यांनी सरवाई पापन्ना यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी बाबुराव पाटील आंदबोरीकर, बालाजी दत्ता पाटील, मारुती बोडेवार, प्रकाश रमणा कोंडलवार, रमेश कोंडलवार, संजीव पाटील गौड, संतोष मारकवार, गणेश ( पप्पु ) बोलेवार, संदीप गौड, श्रीनिवास बोलेवार, बालाजी पिपंळढवकर, संतोष रतनवार, नरेश पाकलवार, संजय मुरगुलवार, श्रीकांत कोंडलवार, रवी गेन्टेवाड, राहुल कोंडलवार, आकाश गेन्टेवाड, पिन्टू रायपलवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शहरातील कलाल गौड समाज संघटनेचे पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सार्वजनिक गणेश मंडळांना घरगुती दराने वीजपुरवठा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सार्वजनिक गणेश मंडळांना महावितरणकडून तात्पुरत्या स्वरुपात आणि त्वरित वीजजोडणीची सुविधा उपलब्ध केली आहे. या जोडणीसाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहे. तरी सार्वजनिक गणेश मंडळांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी केले आहे. गणेश मंडळांना तात्पुरत्या स्वरूपातील वीजजोडणीसाठी नोंदणी प्रमाणपत्र, स्थानिक स्वराज्य संस्था मंडप परवानगी, पोलिस स्थानक परवाना, विद्युत निरिक्षक यांचे वीजसंच सुरक्षित असल्याचे प्रमाणपत्र, वीज मागणी अर्ज, वीजसंच मांडणी चाचणी अहवाल व राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुक छायांकित प्रत इ. कागदपत्रे आवश्यक आहेत. गणेश मंडळांनी आवश्यक कागदपत्रासह नजीकच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा. गणेशोत्सव काळात कोणत्याही प्रकारचे वीज अपघात होऊ नये यासाठी मंडप, रोषणाई व देखाव्यांची उभारणी करताना लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिन्या, वितरण रोहित्रे इ. यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखावे. मंडपातील वीजसंच मांडणी करताना विद्युत सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. मंडपातील वीजसंच मांडणी मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून करून घेण्यात यावी. गणेश मंडळांनी विद्युत सुरक्षा उपाययोजनांमध्ये तडजोड करू नये. आपात्कालीन स्थितीकरिता कार्यक्षेत्रातील महावितरणच्या शाखा अभियंत्यांचे मोबाईल क्रमांक नोंदवून ठेवावेत. याबरोबरच महावितरणच्या मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्राचे 1912, 1800-212-3435 व 1800-233-3435 हे टोल फ्री क्रमांक ग्राहकांच्या सेवेत 24 तास उपलब्ध आहेत, अशी माहिती मुख्य अभियंता डॉ.केळे यांनी दिली आहे.

# वीज प्रवाह सोडून तीन बिबट्यांची शिकार; शिकाऱ्यांची टोळी सक्रिय

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वीज प्रवाह सोडून तीन बिबट्यांची शिकार करण्यात आल्याची घटना देवरी-आमगाव मार्गावरील बिसेन यांच्या राईस मिलला लागून असलेल्या जंगलात घडली. सोमवारी रात्री गावकऱ्यांना हे बिबट मृतावस्थेत आढळून आले. दरम्यान या प्रकाराची गावकऱ्यांमध्ये चर्चा सुरू झाली. वडेगाव येथील काही गावकऱ्यांनी या घटनेची माहिती रात्री ९:३० वाजताच्या सुमारास वनखात्याला दिली. माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. विद्युत प्रवाहाला स्पर्श झाल्याने तिन्ही बिबट्यांचा मृत्यू झाला असून हा प्रकार शिकारीच्या दृष्टीने केल्याचे प्राथमिक तपासात पुढे आले आहे. यासंदर्भात वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनीसुद्धा या घटनेला दुजोरा दिला.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात 38 व्या नेत्रदान पंधरवड्याचा शुभारंभ

## नागरिकांना नेत्रदानासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे येण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे 38 व्या नेत्रदान पंधरवाड्याचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सोनारकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. गायकवाड, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. सरोदे, नेत्र शल्य चिकित्सक डॉ. मनोज शेंडे, नोडल अधिकारी विवेक मसराम, नेत्रचिकित्सा अधिकारी माधुरी कुळसंगे व जिल्ह्यातील सामाजिक संस्थांचे पदाधिकारी मनोविकृती सोशल अधीक्षक श्री. मारशेट्टीवार, नर्सिंग स्कूलचे विद्यार्थी-विद्यार्थिनी व रुग्ण उपस्थित होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे म्हणाले, ईश्वराने मानवी शरीराची रचना दान देण्याकरीता व घेण्याकरीता करण्यात आली आहे. जिवंतपणी रक्तदान, किडनीदान व अवयवदान व मृत्युपश्चात फक्त नेत्रदान करू शकतो. नेत्रदान केल्याने अंध व्यक्तींना दृष्टीप्रदान करू शकतो. या जिल्ह्यात नेत्रदान तयार करण्यास सामाजिक संस्थेला सोबत घेऊन पाठपुरावा करण्याची हमी त्यांनी दिली. अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सोनारकर म्हणाले, नेत्रदानाकरीता समाजात जागृती होणे आवश्यक आहे. ज्या कुटुंबातील व्यक्ति मृत्यु पावतो ते कुटुंब दुःखात असते. अशावेळी समाजातील जागृत नागरीकांनी त्या कुटुंबातील नातेवाईकांसोबत संवाद साधून नेत्रदानाचे महत्त्व पटवून द्यावे व नेत्रदानाला प्रवृत्त करावे. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत बोलतांना डॉ. मनोज शेंडे म्हणाले, बुब्बूळाच्या आजाराने अंध असलेल्या रुग्णांची संख्या वाढत



आहे. यावर एकच उपाय म्हणजे मृत व्यक्तीचा निरोगी बुब्बूळाचे प्रत्यारोपण करणे हा होय. दरवर्षी या रुग्णांमध्ये वाढ होत असते. याकरीता जास्तीत-जास्त मरणोत्तर नेत्रदान करून बुब्बूळाची मागणी व पुरवठा यामधील तफावत दूर करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. भारतामध्ये डोळ्याचे बुब्बूळ आणि ग्रस्तरुग्णांची संख्या सर्वात जास्त आहे. त्यामानाने नेत्रदान करणाऱ्यांची संख्या खूपच कमी आहे. नेत्रदान केल्याने रुग्णाच्या चेहऱ्याला कुठलीही विद्रुपता येत नाही. मरणोत्तर नेत्रदान करावे व दृष्टीहिणाच्या जीवनात प्रकाश निर्माण करून हे जग पुन्हा बघण्याची संधी प्राप्त करून द्यावी. त्यामुळे नागरीकांनी स्वयंस्फूर्तीने नेत्र देण्यासाठी पुढे यावे व अंधाच्या जीवनात प्रकाश निर्माण करावा. नेत्रदान करण्याकरीता जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे संपर्क साधावा. तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नेत्रदानासाठी सहकार्य करावे,असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन नेत्रदान समुपदेशक योगेंद्र इंदुरकर यांनी तर आभार नोडल अधिकारी विवेक मसराम यांनी मानले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर